# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

October 2025 / Issue No. 08 | Price : Rs. 30/-







महाराष्ट्र चेंबरच्या
इतिहासातील
**काळा अध्याय**
पान नं. 19

२२
अक्तूबर

राष्ट्र के यशस्वी, कर्मठ एवं
दूरदर्शी नेता,
केंद्रीय गृह तथा सहकारिता मंत्री

# श्री अमितजी शाह

को जन्मदिन की

## हार्दिक शुभकामनाएँ।

ईश्वर से प्रार्थना है कि आपको दीर्घायु ,
उत्तम स्वास्थ्य और निरंतर सफलता प्रदान करें।



MACCIA ESTD 1927
Apex Chamber of the State
महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर
शताब्दी वर्ष 100

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर**

व्यवस्थापन समिती, सर्व गव्हर्निंग काऊन्सील सदस्य,
तज्ञ समिती सदस्य व सर्व सदस्यगण

CELEBRATING 100 YEARS

MACCIA ESTD 1927
Apex Chamber of the State
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

October 2025 / Issue No. 08

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर**

ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई- ४००००१
फोन : (०२२) २२८५५८५९/६०
ई-मेलः maccia@maccia.org.in
वेबसाईट : www.maccia.org.in

**संपादकीय समिती**

- अध्यक्ष व संपादक
  **ललित गांधी**
- वरिष्ठ उपाध्यक्ष
  **रविंद्र माणगावे**
- उपाध्यक्ष
  **करूणाकर शेट्टी**
  **शंकर शिंदे**
  **संजय सोनवणे**
  **संगीता पाटील**
  **रमाकांत मालु**
  **दिलीप गुप्ता**
  **प्रफुल्ल मालाणी**
  **श्रीकृष्ण परब**

- **उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्यालय**
  ४९, पाचवा मजला, बिजनेस बे, श्रीहरी कुटे मार्ग, मुंबई नाका, नाशिक - ४२२००१
  फोनः (०२५३)२५७७७०४
- **पूणे जिल्हा कार्यालय**
  प्लॉट नं. ईएल-१५, एमआयडीसी, भोसरी, पूणे - ४११०२६.
- **जळगांव जिल्हा कार्यालय**
  २१-ए,श्रीराम स्टेट बँक कॉलनी, रिंगरोड, जळगाव - ४२५००१
- **कोल्हापूर जिल्हा कार्यालय**
  बिझनेस हाऊस, राजारामपूरी १० वी गल्ली, कोल्हापूर - ४१६००८
- **बारामती उप-जिल्हा कार्यालय**
  प्लॉट नं. सी–८८, हॉटेल सुर्या जवळ, एमआयडीसी भिंगवान रोड, बारामती, पुणे – ४१३१३३

**इतर कार्यालय** : अंधेरी (मुंबई), नवी मुंबई, ठाणे, पालघर, धुळे, रत्नागिरी, पलुस (सांगली)

**Note :** Articles published in this bulletin do not necessarily reflect the views of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture.

## अंतरंग

१. करसुधारणांचा नवा अध्याय
२. पंतप्रधान मोदींची चिप्स टू शिप्स घोषणा
३. विकसित महाराष्ट्र २०४७ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दूरदर्शी रोड मॅप
४. भारत-अमेरिका ऊर्जा व्यापार वृद्धीच्या मार्गावर : केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल
५. राज्याची उद्योगसंपन्न महाराष्ट्राकडे वाटचाल : उदय सामंत
६. महाराष्ट्राच्या विकासाला मिळाले नवे पंख!
७. सोलापूर विमानतळाचे उद्घाटन; मराठी उद्योगजगतासाठी नवे उड्डाण!
८. महाराष्ट्रातील उद्योगांसाठी इंडोनेशियाची दारे खुली : कौन्सिलेट जनरल एडी वर्दोया
९. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची ९८ वी सर्वसाधारण सभा उत्साहात
१०. देशांतर्गत बाजारपेठेपासून जागतिक क्षितिजापर्यंत
११. महाराष्ट्र चेंबरच्या इतिहासातील काळा अध्याय
१२. विकासपथावरील वाटचालीचा, धावता आढावा...




## नवचैतन्य आणि विकासाचा दीपोत्सव

भारतीय संस्कृतीचा गाभा केवळ रुढी किंवा परंपरा नसून, त्यामागे तत्त्वज्ञान दडलेले आहे. दिवाळीचा सण म्हणजे अंध:कारातून प्रकाशाकडे जाण्याचा प्रवास. उपनिषदातील तमसो मा ज्योतिर्गमय ही प्रार्थना केवळ आध्यात्मिक नाही, तर सामाजिक, आर्थिक आणि बौद्धिक पातळ्यांवरही आपल्याला दिशा देणारी आहे.

आजच्या बदलत्या जागतिक वातावरणात ही प्रार्थना अधिक अर्थपूर्ण ठरते. उद्योग, व्यापार आणि शेती यांसमोर मोठी आव्हाने उभी आहेत. जागतिक बाजारातील स्पर्धा, हवामान बदलाचे परिणाम, तंत्रज्ञानातील झपाट्याने होणारे बदल आणि समाजाच्या अपेक्षांमधील सतत होणारे परिवर्तन या सर्व आव्हानांवर मात करणे आवश्यक आहे. परंतु हाच काळ नव्या शक्यतांचा आहे. अंध:कार कितीही गडद असला तरी एक दीप पुरेसा असतो; असंख्य दिव्यांचा प्रकाश तर नवी पहाट निर्माण करतो.

सर्वसामान्यांच्या जीवनात आणि उद्योग क्षेत्रात या प्रकाशाचा अर्थ आर्थिक स्थैर्य आणि नवचैतन्य देखील आहे. केंद्र सरकारने GST कर रचनेत केलेल्या सुधारणा या दिवाळीच्या सणासोबत आलेल्या आर्थिक प्रवाहासाठी निर्णायक ठरल्या आहेत. कर प्रक्रियेतील सुलभता, वेगवान परतावा आणि डिजिटल ट्रॅकिंगमुळे उद्योग, व्यापारी आणि सेवाक्षेत्रातील कंपन्यांनी आपले व्यवहार अधिक सुरळीत रितीने पार पाडले.

दसरा–दिवाळीच्या सणाच्या काळात या सुधारित कर रचनेमुळे देशभरात उलाढालीचे नवे विक्रम पाहायला मिळाले. ऑनलाइन आणि ऑफलाइन व्यापार दोन्ही क्षेत्रांमध्ये व्यवहाराचा वेग वाढला, ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ झाला आणि आर्थिक गतिशीलतेने संपूर्ण बाजाराला उजाळा दिला. या काळात उद्योगपती, व्यापारी आणि शेतकरी यांनी एकत्रित प्रयत्न करून आपल्या उत्पादनांची, सेवांची आणि बाजारपेठेची ताकद सिद्ध केली.

गेल्या काही वर्षांच्या संकटांनी समाजाला शिकवले की लवचिकता, सर्जनशीलता आणि सामूहिकतेची ताकदच खरी शक्ती आहे. महाराष्ट्रातील उद्योजकांनी नवे प्रयोग करून उद्योगांना स्पर्धेला तोंड देण्यासाठी सक्षम केले, व्यापाऱ्यांनी डिजिटायझेशन स्वीकारले आणि शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेत शेती उत्पादन क्षमता वाढवली. हे सर्व दर्शवते की आपण प्रत्यक्षात ज्योतिर्गमयच्या मार्गावर वाटचाल करीत आहोत.

दिवाळीचा संदेश सामूहिक उत्तरदायित्वाचा आहे. एकट्या दिव्याने संपूर्ण अंध:कार नाहीसा होत नाही, पण हजारो दिवे एकत्र प्रज्वलित झाले की संपूर्ण समाज उजळतो. त्याचप्रमाणे उद्योगपतींची जबाबदारी केवळ नफा मिळवणे नाही, तर रोजगार निर्मिती, पर्यावरण संवर्धन, सामाजिक बांधिलकी आणि शाश्वत विकास या दिशेने काम करणे तितकेच आवश्यक आहे. व्यापाऱ्याने ग्राहकांचा विश्वास जपावा, शेतकऱ्याने नवे प्रयोग करताना शाश्वततेचा विचार करावा, आणि धोरणकर्त्यांनी या सर्व घटकांना योग्य दिशा द्यावी.

उपनिषदांचा संदेश सांगतो की, प्रकाश म्हणजे ज्ञान, विवेक आणि सर्जनशीलता. त्यामुळे दिवाळी हा उत्सव फक्त रुढी किंवा परंपरा पाळण्यापुरता न राहता समाजाच्या प्रत्येक घटकाने स्वत:च्या कार्यक्षेत्रात ज्ञानाचा, कौशल्याचा आणि आर्थिक प्रबुद्धतेचा दीप प्रज्वलित करावा, हेच त्याचे मूळ तत्त्व आहे.

आज महाराष्ट्रासमोर मोठे ध्येय आहे – औद्योगिक क्रांतीत आघाडी घेणे, जागतिक व्यापारात विश्वासार्ह भागीदार बनणे, आधुनिक शेतीतून ग्रामीण समाजाला बळकटी देणे आणि आर्थिक समृद्धीच्या नवे मार्ग उभारणे. हे ध्येय साध्य करण्यासाठी सामूहिकतेचा, उत्तरदायित्वाचा, प्रामाणिकतेचा आणि आर्थिक प्रकाशाचा समन्वय आवश्यक आहे.

राज्याची शिखर संस्था या नात्याने 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' यासाठीची आपली जबाबदारी सक्षमतेने पार पाडेल याचा विश्वास व्यक्त करावा वाटतो.

दिवाळीचा खरा आनंद केवळ घराघरातील प्रकाशात नसून, समाजाच्या प्रत्येक स्तरात समान संधी, नवचैतन्य आणि समृद्धी निर्माण करण्यात आहे. या विशेषांकाच्या निमित्ताने ''महाराष्ट्र चेंबर पत्रिका'' सर्व उद्योजक, शेतकरी आणि व्यापारी यांना आवाहन करते की, आपण सर्वांनी मिळून **''तमसो मा ज्योतिर्गमय''** या मंत्राचा अर्थ प्रत्यक्षात उतरवूया.

या दीपोत्सवाने महाराष्ट्रातील प्रत्येक उद्योग तेजस्वी होवो, व्यापारी आणि शेतकरी अधिक सक्षम होवो आणि आपल्या समाजाचा सामूहिक प्रकाश जगाला दिशा देणारा ठरो, हीच मंगलकामना!

ललित गांधी

**अध्यक्ष**




# करसुधारणांचा नवा अध्याय

## ग्राहकांना थेट लाभ, उद्योग विश्वात उत्साह

**अर्थमंत्री निर्मला सीतारामनः ५४ वस्तूंवरील दरकपात अंमलात, ग्राहकांपर्यंत फायदा पोहोचतोय का यावर सरकारचे लक्ष**

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने देशातील करप्रणाली अधिक सुलभ, पारदर्शक आणि ग्राहकाभिमुख बनविण्याच्या उद्देशाने जीएसटी २.० या नव्या सुधारणा योजना अंमलात आणल्या आहेत. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १८ ऑक्टोबर २०२५ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित पत्रकार परिषदेत या सुधारणा आणि त्यांच्या परिणामांविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी केंद्रीय वित्तमंत्री पियूष गोयल आणि वित्त राज्यमंत्री अश्विनी वैष्णव उपस्थित होते.

यावेळी अर्थमंत्र्यांनी सांगितले की GST २.० हे भारताच्या कर व्यवस्थेतील सर्वात मोठे पुनर्रचनेचे पाऊल आहे. यात करस्लॅबची संख्या कमी करण्यात आली असून दरांची फेररचना करण्यात आली आहे. यामुळे सामान्य ग्राहक आणि लघुउद्योग या दोघांनाही दिलासा मिळणार आहे. नवीन प्रणालीत गुंतागुंत कमी करून व्यवसायांसाठी 'कंप्लायन्स'सुलभ करण्यात आले आहे. यामागे 'एक राष्ट्र, एक कर, आणि सर्वांसाठी सुलभता, असा उद्देश असून या करसुधारणांमुळे बाजारात स्थिरता येईल आणि वस्तूंच्या किंमती नियंत्रित राहतील, असेही त्या म्हणाल्या.

**५४ वस्तूंवरील दरकपात ; ग्राहकांपर्यंत फायदा पोहोचला का?**

सरकारने विशेषतः ५४ निवडक उपभोग्य वस्तूंवर लक्ष केंद्रित केले आहे. यामध्ये खाद्यपदार्थ, इलेक्ट्रॉनिक्स, घरगुती उपकरणे आणि काही वाहन घटकांचा समावेश आहे.

### 'एक भारत, एक कर, एक उद्दिष्ट' संकल्पनेचा पुढचा टप्पा : पंतप्रधान



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जाहीर केलेल्या GST २.० सुधारणांचे स्वागत करताना म्हटले की, ही सुधारणा केवळ करप्रणाली सुलभ करण्याचे पाऊल नाही, तर देशाच्या आर्थिक स्वातंत्र्याकडे नेणारा मार्ग आहे. ते म्हणाले,GST २.० हे 'एक भारत, एक कर, एक उद्दिष्ट'या आमच्या दृष्टिकोनाचे प्रतिक आहे. या नव्या प्रणालीमुळे देशातील व्यापाऱ्यांना, लघु उद्योजकांना आणि सामान्य ग्राहकांना एकाच वेळी सुलभता, पारदर्शकता आणि स्थिरता मिळणार आहे.

या सुधारणा देशातील व्यवसाय वातावरण अधिक गुंतवणुकीस अनुकूल करतील आणि 'मेक इन इंडिया'ला नवी गती देतील. आमचा उद्देश केवळ महसूल वाढविणे नाही, तर जनतेच्या जीवनात सोय आणि विकास वाढविणे आहे. जीएसटी २.० हा त्या ध्येयाकडे नेणारा निर्णायक टप्पा आहे, असेही मोदी म्हणाले.

कर प्रणालीतील सुलभता आणि डिजिटल पारदर्शकतेमुळे भारताच्या कर इतिहासात नव्या युगाची सुरुवात झाली आहे. भारत आता अशा प्रणालीकडे जात आहे, जिथे प्रामाणिक व्यवसायांना प्रोत्साहन आणि सामान्य नागरिकांना दिलासा मिळतो. हीच आमची सहज करप्रणाली, सशक्त भारत ही दृष्टी असल्याचेही पंतप्रधान म्हणाले.

## मोदी सरकारच्या 'सहज शासन, सशक्त जन'तत्त्वाचे प्रतिक : अमित शाह



गृहमंत्री अमित शाह यांनीही GST २.० सुधारणांचे कौतुक करताना म्हटले की, ही सुधारणा मोदी सरकारच्या पारदर्शक, कार्यक्षम आणि जनकल्याणकारी शासनपद्धतीचे प्रतिक आहे. ते म्हणाले, मोदी यांनी जेव्हा 'नवा भारत'घडविण्याचे स्वप्न मांडले, तेव्हा त्याचा पाया म्हणजे पारदर्शक आणि न्याय्य व्यवस्था. GST २.० हे त्याच स्वप्नाचे ठोस रूप आहे. यामुळे करचुकवेगिरीवर नियंत्रण येईल, व्यापाऱ्यांना सुलभता मिळेल आणि ग्राहकांना थेट फायदा होईल.

अमित शाह यांनी पुढे सांगितले की, या सुधारणांमुळे देशभरातील लघु आणि मध्यम उद्योगांना नवा आत्मविश्वास मिळेल. भारताचा लघुउद्योग वर्ग हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. जीएसटी २.० मुळे त्यांचा आर्थिक भार कमी होईल, आणि रोजगार निर्मितीला चालना मिळेल. GST २.० हे केवळ आर्थिक सुधारणा नसून, हे शासनातील पारदर्शकतेचे आणि नागरिकांशी असलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे, असेही शाह म्हणाले.

## केंद्राचा दिलासादायक निर्णय : ललित गांधी



GST २.० मुळे व्यवसायांना दरमहा कर विवरणपत्र भरण्याची प्रक्रिया सोपी झाली आहे. इनपुट टॅक्स क्रेडिटसाठी पारदर्शक यंत्रणा तयार झाली आहे. या निर्णयामुळे देशी तसेच परदेशी गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढेल. लघु आणि मध्यम उद्योगांसाठी (MSME) या सुधारणांना मोठा दिलासा आहे. कारण नवीन प्रणालीत कर परतावा (Refund Process) जलद झाला आहे आणि दस्तऐवजीकरण कमी करण्यात आले आहे, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (MACCIA) चे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

यावेळी अर्थमंत्र्यांनी सांगितले की, एमएसएमई क्षेत्र हे भारताचा आर्थिक कणा आहे. त्यांना सुलभ करव्यवस्था देणे हे सरकारचे कर्तव्य आहे. GST २.० मुळे त्यांचे संचालन खर्च कमी होतील आणि नफ्यात वाढ होईल. सरकारने या वेळेस डिजिटल मॉनिटरिंग सिस्टम सुरु केली आहे. जीएसटी पोर्टलद्वारे संकलित माहितीचा वापर करून कोणत्या वस्तूंवरील किंमती कमी झाल्या आहेत आणि कोणत्या नाही, याचा डेटा विश्लेषण सुरू आहे. आमचा उद्देश शिक्षा करणे नाही, तर पारदर्शकतेद्वारे सुधारणांना बळ देणे आहे. किंमती कमी न करणाऱ्या व्यवसायांवर कारवाई होईल, पण ती न्याय्य प्रक्रियेतूनच केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

या वस्तूंवरील करदर घटविल्यानंतर प्रत्यक्ष बाजारभाव कमी झाले आहेत का, हा मुद्दा अर्थमंत्रालयाच्या विशेष देखरेखीखाली आहे. आमचा उद्देश केवळ दर कमी करणे नाही, तर तो फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचला आहे का हे पाहणेही तितकेच महत्त्वाचे आहे. यासाठी महसूल विभाग आणि राज्यस्तरीय अधिकारी सातत्याने बाजारातील दरांचे निरीक्षण करत असल्याचेही सीतारामण यांनी सांगितले.

दरम्यान, या दरकपातीचा परिणाम दिवाळीपूर्व विक्रीवर स्पष्ट दिसला. इलेक्ट्रॉनिक्स, वाहन आणि घरगुती वस्तूंच्या विक्रीत २० ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. विशेषतः टीव्ही, फ्रिज, एसी आणि दोनचाकी वाहनांच्या विक्रीत तब्बल वाढ झाल्याचे उद्योगसंघटनांनी सांगितले. सीतारामन म्हणाल्या, सणासुदीच्या काळात ग्राहकांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी केली. उद्योग क्षेत्रातील आकडेवारीनुसार, करदर घटल्यामुळे बाजारात चैतन्य निर्माण झाले आहे. काही उत्पादकांनी तर अपेक्षेपेक्षा अधिक दरकपात करून ती ग्राहकांपर्यंत पोहोचवली आहे.

**यशस्वी होण्यासाठी, तुमचे हृदय व्यवसायात असले पाहिजे आणि व्यवसाय तुमच्या हृदयात असला पाहिजे.**
**– थॉमस जे. वॉटसन,**
IBM चे चेअरमन, सीईओ

**जेव्हा कधी तुम्हाला एखादा यशस्वी व्यवसाय दिसेल, तेव्हा लक्षात ठेवा की कुणीतरी एक धाडसी निर्णय घेतलेला असतो.**
**– पीटर एफ. ड्रकर,**
व्यवस्थापन सल्लागार, शिक्षक आणि लेखक




**केंद्र सरकारने जीएसटी 0.२ ची घोषणा केली. करचनेत बदल केल्यानंतर दसरा आणि दिवाळी या सणांच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशासह महाराष्ट्रातील बहुतांश सर्वच बाजारपेठांत विक्रमी उलाढाल झाल्याचे ऑल इंडिया ट्रेडर्स महासंघ (CIT) ने आपल्या २२ ऑक्टोबर रोजी जाहीर केलेल्या अहवालात म्हटले आहे. या अहवालावरून केलेले हे ग्राफिक्स**

### १. एकूण सणासुदीतील उलाढाल (भारत व महाराष्ट्र)

- भारतातील एकूण उलाढाल: ₹६.०५ लाख कोटी
- महाराष्ट्राचा वाटा (अंदाजे): ₹१.१५ लाख कोटी
- मागील वर्षाच्या तुलनेत वाढ: १८–२०%



### २. वाहन विक्री (दसरा–दिवाळी काळात)

| विभाग | विक्री संख्यावाढ | (%) | प्रमुख ठिकाणे |
|---|---|---|---|
| दुचाकी | ७०,३८१ | २२% | पुणे, नागपूर, नाशिक |
| कार | २९,९०९ | १८% | मुंबई, पुणे, औरंगाबाद |
| व्यावसायिक वाहने | १४,८३५ | १५% | सोलापूर, कोल्हापूर |
| **एकूण** | **१,१५,१२५** | **२०%** | **राज्यभर** |

पुणे जिल्ह्यात सर्वाधिक १३,३८७ नवी वाहने



### ३. किरकोळ बाजारपेठेतील वाढ

| क्षेत्र | वाढ (%) | विशेष बाब |
|---|---|---|
| वस्त्र आणि फॅशन | +३०% | पारंपरिक व आधुनिक डिझाईन्सला मागणी |
| सजावट व भेटवस्तू | +२५% | मेड इन महाराष्ट्र वस्तूंना प्राधान्य |
| इलेक्ट्रॉनिक्स (टीव्ही, फ्रीज इ.) | +२८% | एचख व सवलतींमुळे मागणी वाढ |
| रोषणाई व सजावट साहित्य | +२०% | ₹३,५०० कोटींचा व्यवहार |
| किरकोळ व्यापार | +२०% | |




### ४. मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक उपकरण विक्री

- भारतातील एकूण मोबाईल विक्री : ४८.४ दशलक्ष युनिट्स (+१२%)
- महाराष्ट्रात मोबाईल विक्रीत वाढ : +१४%
- मोबाईल निर्यात : US १.८ अब्ज (₹१५,००० कोटी अंदाजे)
- लॅपटॉप, टीव्ही, टॅबलेट, फ्रीज इ. विक्रीत वाढ : २५–३०%

### ५. कृषी आणि अन्नप्रक्रिया क्षेत्र

- मिठाई, मसाले, तेल उत्पादन वाढ : १५–२०%
- फळ आणि भाज्यांचा पुरवठा वाढला, विशेषत : नाशिक–सोलापूर विभागातून द्राक्ष आणि कांदा निर्यात वाढ : +१०–१२%



### ६. आयात–निर्यात व जागतिक परिणाम

- अमेरिकेने वाढवलेला आयात टॅरिफ : +१०%
- परिणाम : स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन

महाराष्ट्रातून निर्यातीत वाढ : अभियांत्रिकी वस्तू, औषधे, रत्न–अभूषण



### ७. डिजिटल व्यवहार आणि ई–कॉमर्स

- ऑनलाइन खरेदी वाढ : +२८%
- डिजिटल पेमेंट्समध्ये वाढ : +३०%
- ग्रामीण भागातील ई–कॉमर्स सहभागात वाढ दिसली.

### ८. आर्थिक परिणाम (एकूण अंदाज)

| क्षेत्र | उलाढाल (₹ कोटी) | वाढ (%) |
|---|---|---|
| वाहन | २५,००० | २०% |
| वस्त्र, भेटवस्तू, सजावट | ३०,००० | २५% |
| इलेक्ट्रॉनिक्स | ४०,००० | २८% |
| कृषी व खाद्य उत्पादन | १५,००० | १८% |
| **एकूण महाराष्ट्र उलाढाल** | **१,१५,०००** | **२०%** |

### ९. भावी दिशादर्शन

- **स्थानिक उत्पादनांना चालना**
- **MSME व किरकोळ व्यवसायासाठी सुलभ कर्ज धोरणे**
- **डिजिटल व्यवहार व ई–कॉमर्स विस्तार**
- **ग्रीन वाहन आणि पर्यावरणपूरक उत्पादनांची वाढती मागणी**

# पंतप्रधान मोदींची 'चिप्स टू शिप्स' घोषणा

## 'आत्मनिर्भर भारत'साठी देशाची उत्पादन क्षमता वाढविण्याचे आवाहन

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडा येथे २५ सप्टेंबर रोजी झालेल्या उत्तर प्रदेश आंतरराष्ट्रीय व्यापार मेळावा २०२५ (UP International Trade Show 2025) च्या उद्घाटनावेळी देशासाठी एक नवे औद्योगिक ध्येय निश्चित केले, **''चिप्स टू शिप्स''.**

मेक इन इंडिया उपक्रमाच्या ११ व्या वर्धापन दिनानिमित्त त्यांनी ही घोषणा करत आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेला नव्या उंचीवर नेले. या संकल्पनेतून भारत सेमीकंडक्टर उत्पादनापासून जहाजबांधणीपर्यंत सर्व काही देशातच तयार करणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

आत्मनिर्भर भारत ही केवळ घोषणा नाही, ती भारताच्या औद्योगिक भविष्यासाठीचा मार्गदर्शक आहे, असे पंतप्रधान म्हणाले. त्यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांत भारताने उत्पादन, संशोधन आणि नवोपक्रम यामध्ये जबरदस्त झेप घेतली आहे.

मोदी म्हणाले, जेव्हा जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली, तेव्हा आत्मनिर्भरतेचे खरे महत्त्व स्पष्ट झाले. आत्मनिर्भरता म्हणजे जगापासून वेगळे राहणे नव्हे, तर आव्हानांच्या काळात लवचिक राहण्याची ताकद आहे.

पंतप्रधानांनी डिजिटल अर्थव्यवस्थेतील सेमीकंडक्टरचे वाढते महत्त्व अधोरेखित केले.


आज मोबाईल, मोटारगाड्या, संगणक, इलेक्ट्रॉनिक्स, आणि संरक्षण उपकरणे – सर्व काही सेमीकंडक्टरवर अवलंबून आहे. हे २१व्या शतकातील नवे इंधन आहे, असे ते म्हणाले.

भारतातील सेमीकंडक्टर उत्पादनासाठी सरकारने विशेष प्रोत्साहन योजना (Semicon India Programme) आखली आहे. या अंतर्गत जागतिक कंपन्यांना भारतात प्रकल्प उभारण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. गुजरात, तमिळनाडू आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये अशा प्रकल्पांना गती मिळत आहे.

### जहाजबांधणी क्षेत्राला नवी गती :

सेमीकंडक्टरइतकेच महत्त्व जहाजबांधणीलाही देण्यात येणार असल्याचे पंतप्रधानांनी स्पष्ट केले.

भारताचा दीर्घ सागरी इतिहास आहे. आज जहाजबांधणीला आम्ही नव्या धोरणात्मक दृष्टीकोनातून बघत आहोत, असे मोदी म्हणाले. सरकारकडून जहाजबांधणी कारखान्यांना अनुदान, कर सवलती आणि प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.




यामुळे परदेशी जहाजांवरील अवलंबित्व कमी होईल, सागरी सुरक्षा बळकट होईल आणि ब्लू इकॉनॉमी म्हणजेच समुद्री अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. भारतीय नौदलासाठी स्वदेशी युद्धनौका तयार करण्याचे यश या दिशेने प्रेरणादायी ठरत आहे.

### मेक इन इंडिया : दशकभरातील औद्योगिक झेप:

२०१४ मध्ये सुरू झालेला 'मेक इन इंडिया' उपक्रम आज ११ वर्षे पूर्ण करत आहे. या दशकात भारताने असेंब्ली हबपासून उच्च तंत्रज्ञान उत्पादनाच्या केंद्रापर्यंतचा प्रवास केला आहे.

पंतप्रधानांनी आकडेवारीसह नमूद केले की, परकीय गुंतवणुकीत विक्रमी वाढ झाली आहे.

भारत आता मोटारगाड्या, इलेक्ट्रॉनिक्स, संरक्षण साहित्य, औषधनिर्मिती आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रांत जगातील गुंतवणूकदारांचा पसंतीचा देश ठरला आहे.

### 'चिप्स टू शिप्स' : भारताच्या औद्योगिक भविष्यासाठीचा रोडमॅप :

चिप्स टू शिप्स ही घोषणा नव्हे, तर भारताच्या औद्योगिक भविष्यासाठीचा रोडमॅप आहे, असे सांगत पंतप्रधानांनी देशातील उद्योगपती, उद्योजक, स्टार्टअप्स आणि संशोधकांना या क्रांतीचा भाग बनण्याचे आवाहन केले.

त्यांनी सांगितले की, भारताकडे कौशल्यपूर्ण मनुष्यबळ, स्थिर धोरणात्मक वातावरण आणि नवोपक्रमासाठी अनुकूल परिसंस्था आहे. हे सर्व घटक भारताला जागतिक उत्पादन केंद्र बनवतील.

मोदींनी आत्मनिर्भरतेच्या दिशेने झालेल्या प्रगतीची उदाहरणे दिली. संरक्षण क्षेत्रात भारताने शस्त्रसज्जतेत मोठी झेप घेतली आहे. अवकाश तंत्रज्ञानात चांद्रयान-३ आणि गगनयान यांसारख्या मोहिमांमुळे भारत जगाच्या बरोबरीने उभा आहे. औषधनिर्मिती आणि वैद्यकीय उपकरणे क्षेत्रात भारत 'फार्मसी ऑफ द वर्ल्ड' म्हणून ओळखला जात आहे. . या सर्व क्षेत्रांत भारताचे यश म्हणजे आत्मनिर्भरतेची जिवंत उदाहरणे आहेत, असे ते म्हणाले.

### स्टार्टअप्स आणि नवोपक्रमकांसाठी संधींचे विश्व:

पंतप्रधानांनी नव्या पिढीतील उद्योजक आणि स्टार्टअप्सना चिप्स टू शिप्स अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले. नवोपक्रम, संशोधन आणि उत्पादन. या तिन्ही गोष्टींना जर आपण जोडले, तर भारताला उत्पादन महासत्ता बनवणे अवघड नाही, असे त्यांनी सांगितले.

सरकारने स्टार्टअप्ससाठी तयार केलेल्या PM GatiShakti, PLI योजना (Production Linked Incentive) आणि Digital India Mission या उपक्रमांचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की हे सर्व कार्यक्रम परस्परपूरक आहेत आणि औद्योगिक क्रांतीसाठी सक्षम पायाभूत सुविधा उभ्या करत आहेत.

### लवचिकता म्हणजे खरी आत्मनिर्भरता :

पंतप्रधानांनी भाषणाच्या शेवटी सांगितले की, आत्मनिर्भरता म्हणजे जगापासून वेगळे राहणे नव्हे, तर जगाशी आत्म विश्वासाने जोडलेले राहणे आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत जर एखाद्या देशाला स्थैर्य मिळवायचे असेल, तर त्याला स्वतःच्या उत्पादन क्षमतेवर विश्वास ठेवावा लागतो.

भारत आज या वाटेवर ठामपणे पुढे जात आहे. चिप्स टू शिप्स ही घोषणा म्हणजे केवळ औद्योगिक धोरण नव्हे, तर भारताच्या आत्मनिर्भरतेचा पुढचा अध्याय आहे, असे स्पष्ट करत मोदींनी देशातील सर्व उद्योग, व्यापारी आणि शेतकरी वर्गाला आत्मनिर्भर भारत घडवण्यासाठी हातभार लावण्याचे आवाहन केले.

'मेक इन इंडिया'च्या दशकभराच्या प्रवासानंतर आता चिप्स टू शिप्स ही घोषणा भारताच्या औद्योगिक इतिहासातील एक टप्पा ठरणार आहे.

सेमीकंडक्टर, जहाजबांधणी, संरक्षण, इलेक्ट्रॉनिक्स, अवकाश आणि औषधनिर्मिती - या सर्व क्षेत्रांत भारताने आत्मनिर्भरतेच्या दिशेने घेतलेली झेप देशाला केवळ औद्योगिक महासत्ता बनवणार नाही, तर जागतिक अर्थव्यवस्थेत भारताला अग्रक्रम देईल, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

# भारत-अमेरिका व्यापार करार अंतिम टप्प्यात; बहुतेक मुद्द्यांवर सहमती

## द्विपक्षीय कराराला नवी गती मिळण्याची शक्यता; पाच फेऱ्यांच्या चर्चा यशस्वी

**नवी दिल्ली :** भारत आणि अमेरिका यांच्यातील बहुप्रतिक्षित द्विपक्षीय व्यापार करार (Bilateral Trade greement - BT) आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. दोन्ही देशांमधील उच्च-स्तरीय चर्चा आणि वाटाघाटी यशस्वी झाल्या असून, या करारातील बहुतेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर सहमती झाली असल्याची माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली आहे. या करारामुळे दोन्ही देशांच्या व्यापार संबंधांना एक नवी दिशा आणि मोठी गती मिळण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.



मागील काही महिन्यांपासून भारत आणि अमेरिकेमध्ये या व्यापार करारावर सातत्याने चर्चा सुरू होती. या कराराच्या संदर्भात आतापर्यंत दोन्ही देशांच्या प्रतिनिधी मंडळांमध्ये पाच फेऱ्यांच्या चर्चा यशस्वीपणे पार पडल्या आहेत. या चर्चांमध्ये कोणताही मोठा अडथळा किंवा नवी अडचण समोर आलेली नाही.

**'कराराला अंतिम रूप देण्याचे काम सुरू'**

या घडामोडींची माहिती देताना संबंधित अधिकाऱ्याने स्पष्ट केले की, आम्ही बहुतांश विषयांवर एकमत साधले आहे आणि हा करार आता जवळपास अंतिम अवस्थेत आहे. सध्या दोन्ही देश कराराची भाषाशैली आणि तांत्रिक तपशील (legal and technical details) निश्चित करण्यावर काम करत आहेत. एकदा या तपशीलांवर शिक्कामोर्तब झाले की, हा करार स्वाक्षरीसाठी तयार असेल. हा व्यापार करार केवळ दोन्ही देशांमधील व्यापाराची पातळी वाढवणार नाही, तर तो भारत आणि अमेरिका यांच्यातील आर्थिक आणि धोरणात्मक संबंधांना अधिक मजबूत करेल, असे मानले जात आहे. या करारामुळे भारतीय उत्पादनांना अमेरिकेच्या मोठ्या बाजारपेठेत अधिक चांगल्या प्रकारे प्रवेश मिळण्याची शक्यता आहे, तर अमेरिकेच्या कंपन्यांना भारतातील वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठेचा लाभ घेता येईल.



# विकसित महाराष्ट्र २०४७

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दूरदर्शी रोड मॅप

### उद्योग, शेती, पायाभूत सुविधा, ऊर्जा आणि शिक्षण क्षेत्रातील सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट

### २०४७ पर्यंत महाराष्ट्राला 'नंबर वन राज्य' बनवण्याचा संकल्प

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १९ ऑक्टोबर रोजी राज्याचा दीर्घकालीन विकसित महाराष्ट्र २०४७ रोडमॅप जाहीर केला. या आराखड्याचा मुख्य उद्देश म्हणजे भारताच्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षी, म्हणजेच २०४७ मध्ये, महाराष्ट्राला आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक विकासाच्या शिखरावर नेणे.

या योजनेत केवळ अल्पकालीन नव्हे तर पुढील पाव शतकाचा विचार करून तंत्रज्ञान, पर्यावरण, गुंतवणूक आणि मानवी भांडवल यांवर विशेष भर देण्यात आला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सादर केलेल्या या रोडमॅपमध्ये महाराष्ट्राला विकसित राज्य बनवण्यासाठी पाच प्रमुख स्तंभ निश्चित केले आहेत:

**१. उद्योग आणि गुंतवणूक वाढविणे :** राज्यात २०४७ पर्यंत २० लाख कोटी रुपयांची थेट गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट. मुंबई–पुणे–नाशिक–औरंगाबाद–नागपूर औद्योगिक महामार्ग तयार करून इंडस्ट्रियल कॉरिडॉर विकसित करणे. नव्या स्टार्टअप्स आणि MSME युनिट्ससाठी करसवलती व इन्क्युबेशन हब निर्माण करणे.

**२. कृषी क्षेत्राचे आधुनिकीकरण :** शेतकऱ्यांना तंत्रज्ञान आधारित शेतीकडे वळविण्यासाठी स्मार्ट ॲग्रीकल्चर मिशन. सिंचन व्यवस्था, साठवण सुविधा आणि कृषी निर्यातीला चालना. शेती उत्पादकता ४० टक्क्यांनी वाढविण्याचे लक्ष्य.

**३. पायाभूत सुविधा आणि शहरी विकास :** मुंबई, नागपूर, पुणे आणि औरंगाबादला जोडणाऱ्या हाय–स्पीड एक्सप्रेसवे नेटवर्कची उभारणी. ग्रामीण भागात 'स्मार्ट गाव'संकल्पना. ऊर्जा क्षेत्रात ५०% उत्पादन हरित ऊर्जेतून.

**४. शिक्षण आणि कौशल्य विकास :** विद्यार्थ्यांसाठी स्किल महाराष्ट्रप्रकल्प–उद्योगांशी थेट जोडलेले अभ्यासक्रम. प्रत्येक जिल्ह्यात एक तांत्रिक विद्यापीठ स्थापन करण्याचा संकल्प.

**५. सामाजिक आणि पर्यावरणीय संतुलन :** महिला सक्षमीकरण, आरोग्य सेवा व हरित महाराष्ट्र अभियानावर भर. १० कोटी झाडे लावण्याचे लक्ष्य आणि १००% कचरा व्यवस्थापन.

या रोडमॅपमुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सध्याच्या ३५ लाख कोटी रुपयांवरून २०४७ पर्यंत १५० लाख कोटींवर पोहोचेल, असा अंदाज मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला आहे. तसेच राज्यातील GDP वाढदर १०% च्या वर नेण्याचा प्रयत्न होईल. या काळात २ कोटींपेक्षा जास्त रोजगार निर्मितीची शक्यताही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, २०४७ हा केवळ एक वर्ष नाही, तो महाराष्ट्राच्या नवीन युगाची सुरुवात आहे. या आराखड्यासाठी 'विकसित महाराष्ट्र प्राधिकरण'स्थापन करण्याची घोषणा केली. या प्राधिकरणात उद्योग, वित्त, कृषी, शहरी विकास आणि पर्यावरण तज्ज्ञांचा समावेश असेल. दरवर्षी प्रगती अहवाल सादर करून जनतेसमोर पारदर्शकता राखली जाईल.

**दीर्घकालीन परिणाम :**

- ग्रामीण भागात औद्योगिकीकरण वाढल्याने स्थलांतर कमी होईल.
- शिक्षण–रोजगाराचा दुवा मजबूत झाल्याने तरुणांना राज्यातच संधी मिळतील.
- ऊर्जेच्या क्षेत्रातील स्वावलंबनामुळे महाराष्ट्र हरित ऊर्जेत अव्वल बनेल.
- पर्यावरण संवर्धनाचे उपाय पुढील पिढ्यांना टिकाऊ विकासाची हमी देतील.

**महाराष्ट्राला मिळणारे फायदे :**

- राज्यात गुंतवणुकीचा ओघ वाढेल.
- तरुणांना रोजगाराच्या नव्या संधी.
- ग्रामीण भागाचा शाश्वत विकास.
- पायाभूत सुविधा मजबूत होऊन वाहतूक, व्यापार आणि पर्यटन क्षेत्र वाढेल.

राज्याची स्पर्धात्मकता वाढून महाराष्ट्र भारतातील सर्वाधिक 'व्यवसायसुलभ'राज्य बनेल.

**विकसित महाराष्ट्र २०४७ चे प्रमुख लक्ष्य**

| क्षेत्र | उद्दिष्ट |
|---|---|
| • अर्थव्यवस्था | GDP ₹१५० लाख कोटींपर्यंत |
| • उद्योग | २० लाख कोटी गुंतवणूक |
| • रोजगार | २ कोटी नवीन रोजगार |
| • कृषी | उत्पादकता +४०% वाढ |
| • ऊर्जा | ५०% हरित ऊर्जा उत्पादन |
| • पर्यावरण | १० कोटी झाडे लावणे |

# भारत-अमेरिका ऊर्जा व्यापार वृद्धीच्या मार्गावर : केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल

## नवीकरणीय ऊर्जा, अणुऊर्जा व खनिज सहकार्याच्या संधींवर भर; सीमापार ऊर्जा सहकार्य अधिक बळकट करण्याचे आवाहन

**नवी दिल्ली/न्यूयॉर्क, दि. २३ :** भारत लवकरच अमेरिकेसोबत ऊर्जा व्यापार मोठ्या प्रमाणात वाढविणार असल्याचे उद्योग व वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी न्यूयॉर्क येथे झालेल्या Energy Security in a Shifting Global Landscape: Building Resilient Energy Markets cross Borders या परिषदेत स्पष्ट केले.

भारताच्या ऊर्जा सुरक्षिततेच्या उद्दिष्टांमध्ये अमेरिकेचा मोठा सहभाग राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. ऊर्जा क्षेत्रातील सहकार्यामुळे किंमत स्थिरता, विविध स्रोतांची उपलब्धता तसेच द्विपक्षीय संबंधांना नवे बळ मिळेल, असेही त्यांनी नमूद केले.

नवीकरणीय ऊर्जेवर भर : भारताच्या स्वच्छ ऊर्जा प्रवासाचा उल्लेख करताना गोयल यांनी सांगितले की, सध्या देशाची नवीकरणीय ऊर्जा क्षमता २५० गीगावॅट्स असून ती पुढील काही वर्षांत जवळपास ५०० गीगावॅट्स करण्याचा मानस आहे. या संक्रमणात अमेरिकेची तंत्रज्ञान, गुंतवणूक आणि संसाधन पुरवठा महत्त्वाची भूमिका बजावू शकतो, असे ते म्हणाले.

हायड्रोजन, ग्रीन अमोनिया, इथेनॉल मिश्रण, फ्लेक्सी-फ्युएल इंजिन्स यांसारख्या क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांनी सहकार्य करण्याची मोठी संधी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. ऊर्जा क्षेत्रातील नवकल्पना एका देशापुरती मर्यादित नाही, असे सांगून त्यांनी भारत-अमेरिका सहकार्य जागतिक पातळीवरील स्वच्छ ऊर्जा संक्रमण वेगाने घडवू शकते, असे मत व्यक्त केले.



### अणुऊर्जा व खनिज सहकार्य :

अणुऊर्जेबाबत बोलताना गोयल म्हणाले की भारताने अणुऊर्जा क्षमता दुप्पट करण्याचा संकल्प केला आहे. मात्र खर्च व स्पर्धात्मकतेच्या अडचणी असून अमेरिकन सहकार्यामुळे अणुऊर्जा अधिक परवडणारी आणि व्यवहार्य होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, भारत-अमेरिका यांच्यातील महत्त्वपूर्ण बॅटरी खनिज पुरवठा साखळी (लिथियम, कोबाल्ट आदी) विषयक सामंजस्य कराराचा उल्लेख करून या खनिजांमुळे इलेक्ट्रिक वाहन आणि नवीकरणीय ऊर्जा संचयनासाठी स्थैर्य मिळेल, असे ते म्हणाले.

### संतुलित व्यापार धोरणांची गरज :

व्यापार धोरणांत संरक्षणवाद शिरकाव करत असल्याबद्दल गोयल यांनी इशारा दिला. युरोपियन युनियनच्या कार्बन बॉर्डर ॲथडजस्टमेंट मेकॅनिझम (CBM) यावर टीका करत त्यांनी अशा उपाययोजना विकसनशील देशांच्या हिताला बाधक ठरू शकतात, असे सांगितले. त्याऐवजी, ऊर्जा बाजारपेठा सीमापार एकत्रित करून नियमांचे सुसंगतीकरण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

भारत आणि अमेरिका या जगातील दोन मोठ्या लोकशाही राष्ट्रांना शाश्वत, परवडणारी आणि लवचिक ऊर्जा व्यवस्था उभारण्याची सामायिक जबाबदारी असल्याचे सांगून गोयल म्हणाले, ऊर्जेतील आपले सहकार्य केवळ व्यापारापुरते मर्यादित नाही. तर ते जागतिक विकासाचे भविष्य घडविणारे आहे.

# राज्याची उद्योगसंपन्न महाराष्ट्राकडे वाटचाल

## उदय सामंत यांच्या पुढाकाराने राज्यातील उद्योगवाढीला गती देण्यासाठी विविध क्षेत्रांतील कंपन्यांसोबत सामंजस्य करार



**मुंबई :** महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी गेल्या महिनाभरात राज्यात उद्योग वाढविण्यासाठी आणि नव्या गुंतवणुकीला चालना देण्यासाठी अनेक कंपन्यांशी सामंजस्य करार (MOU) केले. या करारांमुळे महाराष्ट्रात हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक येणार असून मोठ्या प्रमाणावर थेट आणि अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार आहे. 'उद्योगसंपन्न महाराष्ट्र'या ध्येयाने प्रेरित होत, सरकारने उद्योग क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा निर्धार केला आहे.

या कालावधीत मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद तसेच रत्नागिरी–सिंधुदुर्ग या औद्योगिक जिल्ह्यांमध्ये देशी आणि परदेशी गुंतवणूकदारांशी महत्त्वाचे करार करण्यात आले. ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स, फार्मा, ग्रीन एनर्जी, पेट्रोकेमिकल, टेक्सटाईल, आणि फूड प्रोसेसिंग या क्षेत्रांतील कंपन्यांनी महाराष्ट्रात नवीन प्रकल्प उभारण्याची तयारी दर्शविली आहे.

याबाबत उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगितले की, राज्य सरकार उद्योगवाढीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करत आहे. गुंतवणूकदारांना आवश्यक त्या सर्व सवलती, पायाभूत सुविधा आणि जलद परवानगी प्रक्रिया देण्यासाठी 'सिंगल विंडो सिस्टम'प्रभावीपणे राबवत आहे. त्यामुळे महाराष्ट्र पुन्हा एकदा उद्योगांचे सर्वाधिक पसंतीचे ठिकाण बनत आहे.

या सामंजस्य करारांमध्ये टाटा ग्रुप, अदानी ग्रीन एनर्जी, महिंद्रा इलेक्ट्रिक, हिंदुस्थान पेट्रोलियम, सीमेंस, फॉक्सकॉन, रिलायन्स न्यू एनर्जी, गोदरेज इंडस्ट्रीज यांसारख्या नामांकित कंपन्यांचा समावेश आहे. एकूण सुमारे १.२५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असून अंदाजे ३ लाखांहून अधिक रोजगार निर्माण होण्याची शक्यता असल्याचे मंत्री सामंत यांनी यावेळी सांगितले.

राज्य सरकारच्या मेक इन महाराष्ट्र आणि ग्रीन इंडस्ट्रियल पॉलिसी २०२५ या उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरणपूरक, टिकाऊ आणि तंत्रज्ञानाधारित उद्योग उभारण्यावर भर दिला जात आहे. विशेषत: कोकण भागात पर्यटन, मत्स्य, जहाज बांधणी आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रात नव्या गुंतवणुकीसाठी प्रयत्न सुरू आहेत.

उद्योगमंत्री सामंत यांनी या चेण स्वाक्षरी कार्यक्रमांनंतर सांगितले की, गुंतवणूकदारांना विश्वास देणे हे सर्वात महत्त्वाचे आहे. महाराष्ट्राचा औद्योगिक वारसा मजबूत आहे आणि आम्ही तो आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडून नवे औद्योगिक युग उभारू. या करारांमुळे केवळ महानगरांमध्ये नव्हे तर विदर्भ, मराठवाडा आणि कोकणातील औद्योगिक परिसरालाही नवसंजीवनी मिळेल, असेही उद्योगमंत्री सामंत म्हणाले.

**"तुमचे उद्दिष्ट नेहमी मोठे ठेवा; कारण मोठे विचारच मोठी स्वप्ने पूर्ण करतात.**

**– धीरूभाई अंबानी**

रिलायन्स उद्योगाचे संस्थापक

**"उद्योगाचे यश केवळ नफ्यात मोजता येत नाही, तर समाजावरच्या परिणामात दिसते.**

**– आनंद महिंद्रा**

चेअरमन–महिंद्रा ॲण्ड महिंद्रा




# महाराष्ट्राच्या विकासाला मिळाले नवे पंख!

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे पंतप्रधानांच्या हस्ते भव्य उद्घाटन
## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व केंद्रीय मंत्री उपस्थित

**नवी मुंबई :** महाराष्ट्राच्या विकासाच्या नव्या पर्वाला गती देणारा ऐतिहासिक क्षण अखेर साकारला. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (NMI) नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राष्ट्राला समर्पित करण्यात आले. या सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री किंजरापू राममोहन नायडू, महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत, सिडकोचे अधिकारी आणि प्रकल्पसहभागी अदानी समूहाचे प्रमुख गौतम अदानी यांची उपस्थिती होती.

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले, नवी मुंबई विमानतळ हा 'विकसित भारत २०४७' या दृष्टिकोनातील एक भक्कम टप्पा आहे. हे विमानतळ भारताच्या पायाभूत सुविधांच्या विकासातील नवा मानदंड प्रस्थापित करेल. महाराष्ट्र हे देशाच्या आर्थिक प्रगतीचे इंजिन आहे आणि या विमानतळामुळे जागतिक गुंतवणुकीसाठी येथे नवे दार खुले होईल.

ते पुढे म्हणाले की, मुंबई विमानतळावरील वाढती गर्दी लक्षात घेता दुसऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळाची गरज होती. आता नवी मुंबई विमानतळामुळे मुंबई–पुणे–कोकण–रायगड या प्रदेशांच्या अधिक बळ मिळेल. हे विमानतळ केवळ प्रवासाचे साधन नाही, तर नोकऱ्या, व्यापार आणि पर्यटनाच्या नव्या संधी निर्माण करणारे केंद्र ठरेल. या विमानतळाच्या उद्घाटनाने केवळ मुंबईतील हवाईवाहतुकीवरील ताण कमी होणार नाही, तर महाराष्ट्रातील औद्योगिक, व्यापारी आणि पर्यटन क्षेत्राला अभूतपूर्व चालना मिळेल. तसेच या विमानतळाच्या माध्यमातून मुंबई महानगर प्रदेशाचा (MMR) विकासाचा पट आणखी विस्तारित होईल.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाची अंमलबजावणी वेळेत पूर्ण होण्यासाठी सिडको आणि राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, नवी मुंबई विमानतळामुळे महाराष्ट्राच्या औद्योगिक नकाशावर नवे युग सुरु झाले आहे. हा प्रकल्प केवळ पायाभूत सुविधा नाही, तर आत्मनिर्भर भारताच्या दिशेने एक ठोस पाऊल आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले की, हे विमानतळ मुंबईच्या आर्थिक हृदयाला नवसंजीवनी देईल. रायगड, ठाणे, पनवेल, कर्जत आणि नवी मुंबई परिसरातील गुंतवणूक वाढेल. स्थानिक युवकांसाठी हजारो रोजगारनिर्मिती होईल. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा आशियातील अत्याधुनिक आणि पर्यावरणपूरक विमानतळ म्हणून ओळखले जाणार आहे. या विमानतळाच्या पहिल्या टर्मिनल इमारतीची वार्षिक प्रवासी क्षमता सुमारे २ कोटी प्रवासी इतकी आहे, तर संपूर्ण प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ती क्षमता ९ कोटी प्रवासी प्रति वर्ष होईल, असेही ते म्हणाले.

## वाहतूक सुलभतेचे नवे युग

नवी मुंबई विमानतळाला मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग, ठाणे–बेलापूर मार्ग, कोस्टल रोड, मेट्रो नेटवर्क आणि आगामी ट्रान्स–हार्बर लिंकशी थेट जोडणी मिळणार आहे. त्यामुळे मुंबई व ठाणेतील प्रवाशांना विमानतळ गाठण्यासाठी लागणारा वेळ कमी होईल. तसेच, विमानतळाच्या परिसरात मल्टी–मोडल ट्रान्सपोर्ट हब उभारण्यात येणार असून, रेल्वे आणि मेट्रो स्थानके थेट विमानतळाशी जोडली जाणार आहेत. या विमानतळामुळे राज्यात आणि विशेषतः मुंबई महानगर प्रदेशात गुंतवणुकीसाठी नवे दरवाजे उघडतील. आयटी, लॉजिस्टिक, बांधकाम, पर्यटन आणि निर्यात उद्योगांना मोठ्या प्रमाणावर फायदा होईल. स्थानिक व्यवसायांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी थेट जोडणी मिळाल्याने सुमारे १ लाखांहून अधिक रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे. दरम्यान, अदानी समूहाच्या माध्यमातून हे विमानतळ जागतिक दर्जाचे ग्रीन एअरपोर्टम्हणून विकसित केले जात असून, येत्या काही महिन्यांत येथे मुंबई, दिल्ली, हैदराबाद, बेंगळुरू आणि दुबई या मार्गांवरील नियमित हवाईसेवा सुरू होणार आहेत.

## अत्याधुनिक सुविधा

विमानतळाचे वास्तुरचनाकार जगप्रसिद्ध डिझायनर झाहा हदीद आर्किटेक्ट्स या कंपनीने भारतीय पारंपरिक घटकांवर आधारित आकर्षक आणि हरित डिझाइन तयार केले आहे. सौरऊर्जेवर आधारित वीजपुरवठा, पर्जन्यजल संधारण, हरित उद्याने आणि सांडपाण्याच्या पुनर्वापराची यंत्रणा अशा अनेक टिकाऊ उपक्रमांचा समावेश या विमानतळात करण्यात आला आहे. याशिवाय, प्रवाशांसाठी ‘स्मार्ट टर्मिनल’प्रणाली, डिजिटल चेक–इन, फेस रिकग्निशन तंत्रज्ञान, एआय–आधारित सुरक्षा व्यवस्था आणि ऑटोमेटेड बॅगेज हँडलिंग सिस्टम यांसारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.







# सोलापूर विमानतळाचे उद्घाटन; मराठी उद्योगजगतासाठी नवे उड्डाण!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री आणि मंत्री मोहोळ यांच्या उपस्थितीत सोहळा, महाराष्ट्र चेंबर अध्यक्ष ललित गांधींच्या पाठपुराव्याला यश

**सोलापूर :** दीर्घ प्रतीक्षेनंतर सोलापूर विमानतळाचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री नाम. चंद्रकांतदादा पाटील, नाम. छगन भुजबळ पालकमंत्री नाम. जयकुमार गोरे, आमदार सुभाष देशमुख आणि माजी खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महाराष्ट्र चेंबर च्या सिव्हील एव्हिऐशन कमिटीचे को-चेअरमन केतन शहा यांच्या उपस्थितीत झाले. या नव्या टप्प्यामुळे सोलापूर आणि परिसरातील औद्योगिक, व्यावसायिक तसेच कृषी क्षेत्राला नवे बळ मिळणार आहे. या प्रकल्पाच्या वेगवान अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे केंद्र व राज्य सरकारांमध्ये समन्वय साधला गेला आणि विमानतळाच्या विकासाची प्रक्रिया गतिमान झाली.

उद्घाटन सोहळ्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सोलापूर हे महाराष्ट्राच्या औद्योगिक नकाशावरील एक महत्त्वाचे केंद्र आहे. या विमानतळामुळे गुंतवणुकीच्या नव्या संधी निर्माण होतील, तसेच रोजगारवाढीस चालना मिळेल. राज्य सरकार सोलापूरला 'इंडस्ट्रियल गेटवे' म्हणून विकसित करण्यास वचनबद्ध आहे.

मंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही या विमानतळाचे शहराच्या प्रगतीतील महत्त्व अधोरेखित केले. या विमानतळामुळे पुणे, मुंबई, हैदराबाद यांसारख्या मोठ्या केंद्रांशी सोलापूरचे थेट हवाई संपर्क प्रस्थापित होईल. पर्यटन, शिक्षण आणि उद्योग क्षेत्रासाठी हे मोठे वरदान ठरेल, असे ते म्हणाले.

दरम्यान, विमानतळावर सुरुवातीला मुंबई आणि पुणे या दोन मार्गांवरील हवाईसेवा सुरू होणार असून, पुढील टप्प्यात इतर महानगरांशी जोडणी करण्याचे नियोजन आहे. सोलापूरच्या विकासातील हा टप्पा ऐतिहासिक ठरला असून, राज्यातील संत नगरीला आता आकाशमार्गानेही नवे पंख लाभले आहेत.

### महाराष्ट्र चेंबरच्या पाठपुराव्याला यश : ललित गांधी

सोलापूरसारख्या वाढत्या औद्योगिक शहराला हवाई सुविधा आवश्यक होत्या. महाराष्ट्र चेंबरने वेळोवेळी शासनाकडे मागणी केली, चर्चा केली आणि अखेर हा दिवस उजाडला. यामुळे येत्या काळात गुंतवणुकीत आणि व्यापारवाढीत मोठी झेप घेता येईल. या विमानतळमुळे स्थानिक उद्योगांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी थेट जोडता येणार आहे. सोलापूरच्या वस्त्रोद्योग, बी-बियाणे उत्पादन, आणि कृषी उत्पादन निर्यात क्षेत्रासाठी हे नवे पायाभूत पाऊल ठरेल, तसेच सदर विमानतळासाठी महाराष्ट्र चेंबर च्या सिव्हील एव्हिऐशन कमिटीचे को-चेअरमन केतन शहा व सोलापूर विकास मंच चे पदाधिकारी यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांचाही यामध्ये वाटा महत्वपूर्ण आहे, असे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.




◆ **कोल्हापूर : कौन्सिलेट जनरल एडी वर्दोया यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी. सोबत इंडोनेशिया कौन्सिलेट चे वाणिज्य विभागाचे एको जुनोर. डावीकडून श्रीमती डायन हयाती सॅम्स्यूवीर किबे, हर्षवर्धन मालू, मनोज झंवर, नितीन वाडीकर, कुशल सामाणी, आश्विनी दानिगौंड, जयेश ओसवाल, कमलाकांत कुलकर्णी, गोशिमाचे अध्यक्ष सुनिल शेळके, प्रसन्ना तेरदाळकर, शांताराम सुर्वे व इतर मान्यवर.**

# महाराष्ट्रातील उद्योगांसाठी इंडोनेशियाची दारे खुली

## कौन्सिलेट जनरल एडी वर्दोया : स्थानिक उत्पादनांना मोठी संधी

**कोल्हापूर** : कोल्हापुरातील उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्रातील स्थिती मजबूत असून येथील उत्पादने दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांसह कोल्हापुरातील उद्योगांसोबत व्यावसायिक भागीदारी करण्यास आम्ही इच्छूक आहोत. तसेच कोल्हापुरात गुंतवणुकीसाठीही आम्ही तयार आहोत, असे प्रतिपादन इंडोनेशियाचे कौन्सिलेट जनरल एडी वर्दोया यांनी केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड ॲग्रिकल्चरच्या पुढाकाराने उद्यमनगर येथील कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनच्या झंवर सभागृहात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी इंडोनेशिया कौन्सिलेट वाणिज्य विभागाचे एको जुनोर, अधिकारी श्रीमती डायन हयाती सॅम्स्यूवीर किबे, प्रशासन विभागाचे मुस्तपा अन्सारी, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी उपस्थित होते.

यावेळी झालेल्या चर्चेत कोल्हापूर इंजि. असोसिएशनचे अध्यक्ष कमलाकांत कुलकर्णी, शांताराम सुर्वे, उद्योजक सचिन शिरगावकर, गोशिमाचे अध्यक्ष सुनिल शेळके, कोल्हापूर चेंबरचे मानद सचिव जयेश ओसवाल, एस. डी. पेंडसे, रोनक शहा, मनोज झंवर, धैर्यशील पाटील यांनी सहभाग घेतला. आणि कॉऊन्सिलेट जनरल यांच्याशी संवाद साधला. या बैठकीला राहुल नष्टे, धनंजय दुग्गे, ओंकार पोळ, हर्षवर्धन मालू, नितीन वाडीकर, प्रितेश कर्नावट, राहुल मेंच, विमलकुमार बंब, रमाकांत मालू, विजय म्हामणे, इखालस पाटील, कुशल सामानी, प्रसन्ना तेरदाळकर, एस. आर. कडुकर यांच्यासह अनेक उद्योजक उपस्थित होते.

पुढे बोलताना एडी वर्दोया म्हणाले, महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातून भागीदारीसाठी इच्छूक उद्योजकांशी आम्ही चर्चा करू आणि पुढील दिशा निश्चित करू.

त्यांनी पुढे सांगितले की, ऑक्टोबर २०२५ मध्ये इंडोनेशियाची राजधानी जकार्ता येथे ४० वे व्यापार प्रदर्शन आयोजित केले आहे. या प्रदर्शनाला कोल्हापुरातील उद्योजक आणि उत्पादकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले. यामुळे इंडोनेशियातील आयातदार, उत्पादक, उद्योजक व व्यापाऱ्यांशी थेट संवाद साधता येईल, असे ते म्हणाले. व्यापार–उद्योग वृद्धीसाठी आम्ही कोल्हापुरातील उद्योजकांना सर्वोतोपरी सहकार्य करू, अशी ग्वाही वर्दोया यांनी यावेळी दिली.

यावेळी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी प्रस्ताविक भाषणात इंडोनेशियाच्या प्रतिनिधींचे स्वागत केले. ते म्हणाले, भारत आणि इंडोनेशिया यांचे व्यापारी तसेच राजकीय संबंध सौहार्दपूर्ण आहेत. राज्यात नवनवीन उद्योग आणि विदेशी गुंतवणूक वाढावी यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. महाराष्ट्र चेंबरही आंतरराष्ट्रीय व्यापार–उद्योग संबंध वृद्धीवर लक्ष केंद्रीत करून कार्यरत आहे. या पार्श्वभूमीवर इंडोनेशिया कौन्सिलेटचे कोल्हापुरात आगमन आणि उद्योजकांशी थेट संवाद हा आनंददायी आहे.

गांधी पुढे म्हणाले, इंडोनेशियातील व्यापाऱ्यांना टो पार्टस, प्रिसिजन इंजिनिअरिंग, कृषी उत्पादने आणि पॅकेजिंग उद्योगातील उत्पादनांबद्दल विशेष रस आहे. त्यामुळे कोल्हापुरातील उद्योग–व्यापाऱ्यांना इंडोनेशियाशी भागीदारी करणे सहज शक्य होईल. या अनुषंगाने महाराष्ट्र चेंबरच्या वतीने कोल्हापुरातील उद्योजकांचे शिष्टमंडळ इंडोनेशियाला नेण्यात येईल. तसेच उद्योजकांसोबत विभागनिहाय बैठका घेऊन पुढील दिशा निश्चित केली जाईल.

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची ९८ वी सर्वसाधारण सभा उत्साहात

## व्यापारी-उद्योगपतींची मोठ्या संख्येने उपस्थिती; अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली संपन्न






◆ **मुंबई : महाराष्ट्र चेंबरच्या सभागृहात आयोजित सर्वसाधारण सभेत बोलताना अध्यक्ष ललित गांधी. दुसऱ्या छायाचित्रात ललित गांधी यांचे अभीष्टचिंतन करताना राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा**

**मुंबई :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर (MACCIA) ची ९८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी मुंबईतील चेंबरच्या मुख्य कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सभेला संस्थेचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, संजय सोनवणे, संगीता पाटील, एस. डी. परब, शंकर शिंदे, दिलीप गुप्ता, रमाकांत मालू, प्रफुल्ल मालाणी, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा, निमंत्रित कांतीलाल चोपडा उपस्थित होते.

सभेचे संयोजन संस्थेच्या सहकार्यवाह श्रीमती शीतल पांचाळ यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात स्वागतपर भाषणाने झाली. त्यानंतर मागील वर्षाच्या ९७ व्या सर्वसाधारण सभेतील ठरावांना मंजुरी देण्यात आली. २०२४–२ या आर्थिक वर्षाचा अहवाल आणि लेखापरीक्षण अहवाल सादर करून सर्वानुमते मंजूर करण्यात आला. मागील सभेच्या ठरावांची अंमलबजावणी आणि त्यावरील पुढील कार्यवाही यावर सविस्तर चर्चा झाली. सभेत २०२५–२६ या कालावधीसाठी नवीन अध्यक्ष ललित गांधी व वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे यांच्या अनुक्रमे २० जुन २०२५ व ०५ जुलै २०२५ रोजी जाहीर झालेल्या निवडणूक निकालाप्रमाणे झालेल्या निवडीवर शिक्का मोर्तब करण्यात आले.

सभेला सदस्य संदीप भंडारी, धैर्यशील पाटील, सुनीता फालगुणे, विकास पागरे, नकुल पार्सेकर, अनिल गचके, रेखा पागधरे, भरत गांधी, मानसी खानोलकर, रमेश आरवाडे, मनोज वालावलकर, राजाराम सांगळे, विजय जैस्वाल, प्रशांत जोशी, केतन शाह, अंजू सिंघल, सचिन शाह, ओमप्रकाश अग्रवाल, मिलिंद प्रभू, संदीप सोमवंशी, धनश्री हरदास, वेदांशु पाटील, अजित सुराणा, रंजीत सिंग आनंद, गोरख माळी, रतन पडवळ, दत्ता भालेराव, प्रमोद सांगोडे, शिवाजी घोगळे, राजेंद्र कोठावदे, बाळासाहेब गुंजाळ, अश्विनीकुमार परदेशी, दिलीप गांधी, विकास अच्छा, विकास देवधर, राहुल हिंगमिरे, तनसुख झाबंड, विनोद बियाणी, प्रज्ञा पोंक्षे, निलेश घरत, बाळासाहेब सोळांकुरे पाटील, स्वनील जैन, सतीश लोणकर, भावेश माणेक, संस्थेच्या सरकार्यवाह शितल पांचाळ, सहाय्यक सरकार्यवाह जे. के. पाटील, उपसचिव नितीन शेलार, सहाय्यक सचिव अविनाश पाठक आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित सदस्यांनी उद्योग, व्यापार, कृषी आणि निर्यात क्षेत्रातील चालू घडामोडींवर मते मांडली. संस्थेच्या भावी कार्ययोजनेसंदर्भात चर्चासत्र झाले. शेवटी सर्व सदस्यांनी उद्योगवृद्धी व व्यापारी ऐक्य वाढवूया निर्धाराने सभेचा समारोप करण्यात आला.

### ललित गांधी यांचा वाढदिवस उत्साहात...

यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी उपस्थित राहून ललित गांधी यांचे अभीष्टचिंतन केले. तसेच भावी काळासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी मंत्री लोढा आणि ललित गांधी यांनी उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्रा संबंधी चर्चा केली.

# देशांतर्गत बाजारपेठेपासून जागतिक क्षितिजापर्यंत

## ललित गांधी यांच्या प्रेरणेतून श्रीकांत राजाराम पडोळ यांचा यशस्वी निर्यात प्रवास






**यशोगाथा नवउद्योजकाची**

श्रीकांत राजाराम पडोळ यांनी २०२० साली NR Farm Product ही कंपनी सुरू केली. सुरुवातीला देशांतर्गत बाजारपेठेत सातत्याने प्रगती करत, त्यांनी आपल्या उत्पादनांची गुणवत्ता आणि सातत्यपूर्ण सेवा यामुळे ठोस स्थान निर्माण केलं. काही वर्षांच्या उद्योगातील अनुभवातून आणि महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली पुढे जाण्याची आणि नव्या संधी शोधण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. याच काळात त्यांचा महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरशी परिचय झाला. संस्थेचं सदस्यत्व घेतल्यानंतर त्यांच्या व्यावसायिक वाटचालीला नवी दिशा मिळाली.

**इंडोनेशिया दौऱ्याने उघडली नव्या संधींची दारे :**

श्रीकांत यांना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित इंडोनेशिया व्यापार दौऱ्यात सहभागी होण्याची संधी मिळाली. अत्यंत बारकाईने आखलेल्या कार्यक्रमामुळे संपूर्ण दौरा शिस्तबद्ध आणि फलदायी ठरला. या दौऱ्यात जकार्ता बिझनेस चेंबर ऑफ कॉमर्ससोबत झालेल्या बैठकीत त्यांना इंडोनेशियातील फूड इंडस्ट्री आणि रेफ्रेशमेंट क्षेत्रातील नामवंत व्यावसायिकांशी भेटण्याची संधी मिळाली. या भेटींमुळे अनेक नवे व्यावसायिक संबंध प्रस्थापित झाले आणि भविष्यातील सहकार्यासाठी संपर्काचे दरवाजे खुले झाले.

**बेदाण्याच्या निर्यातीचा यशस्वी अध्याय :**

दौऱ्यानंतर श्रीकांत यांनी बेदाण्याच्या निर्यातीसाठी प्रयत्न सुरू केले. विदेशातील व्यापाऱ्यांशी पत्रव्यवहार करत, योग्य बाजारपेठ शोधण्याचं काम सातत्याने सुरू ठेवलं. दोन वर्षांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतर अखेर इंडोनेशियातून पहिली ऑर्डर मिळाली. NR Farm Product ने एका वर्षात तब्बल १२ कंटेनर बेदाणे इंडोनेशियाला निर्यात करून सुमारे अडीच कोटी रुपयांचा व्यवसाय साधला. हा त्यांच्या कारकिर्दीतील अभिमानाचा टप्पा ठरला.

**महाराष्ट्र चेंबरकडून प्रेरणा आणि मार्गदर्शन :**

श्रीकांत यांचा विश्वास आहे की या यशामागे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचे मार्गदर्शन आणि प्रेरणा महत्त्वाची ठरली. त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या इंडोनेशिया दौऱ्यामुळे आत्मविश्वास वाढला, नेटवर्किंगचे महत्त्व समजले आणि जागतिक बाजारपेठेकडे पाहण्याचा दृष्टीकोन विकसित झाला. व्यावसायिक नियोजन, वेळेचं व्यवस्थापन आणि संपर्कवृद्धी या सर्व बाबतीत त्यांनी मार्गदर्शन केले. अलीकडेच श्रीकांत यांनी पुन्हा इंडोनेशिया भेट दिली आणि नव्या व्यावसायिक संधींचा लाभ घेतला. ललित गांधी यांच्या प्रेरणेनेच मी पहिल्यांदा विदेशात बेदाणे निर्यात केली. त्यांच्या प्रोत्साहनामुळे जागतिक बाजारपेठेत आत्मविश्वासाने उतरता आलं, असे त्यांनी सांगितले.

**यशामागील प्रेरणा :**

श्रीकांत यांच्या यशोगाथेतून हे स्पष्ट दिसून येतं की योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर कोणताही उद्योजक जागतिक पातळीवर यश मिळवू शकतो. महाराष्ट्र चेंबरने उद्योजकांसाठी उघडलेले हे व्यासपीठ अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

**शेवटी ते म्हणतात, माझ्या यशात महाराष्ट्र चेंबर आणि ललित गांधी यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांच्या प्रोत्साहनामुळेच देशाबाहेर व्यवसाय करण्याची संधी मिळाली.**

सर्व सहकाऱ्यांना आणि उद्योगविश्वाला दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

# महाराष्ट्र चेंबरच्या इतिहासातील काळा अध्याय;

## पण शेवटी सत्यच जिंकेल

**- ललित गांधी**

**• अफवा, धमक्या आणि बेकायदेशीर हालचालींना संस्थेत स्थान नाही !**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर ही राज्यातील एक प्रतिष्ठित, शंभर वर्षांचा इतिहास असलेली शिखर संस्था आहे. व्यापार, उद्योग, कृषी आणि उद्योजकतेच्या क्षेत्रात या संस्थेने नेहमीच दिशादर्शक कार्य केले आहे. अनेक दिग्गज, प्रख्यात उद्योगपती, व्यापारी आणि समाजसेवकांनी या संस्थेच्या कार्यात आपले योगदान दिले आहे.

संस्थेच्या अध्यक्षपदी मी लोकशाही मार्गाने निवडून आलो आहे. ही केवळ माझ्यासाठी सन्मानाची गोष्ट नाही, तर मोठी जबाबदारीही आहे. माझी अध्यक्षीय मुदत जून २०२६ पर्यंत आहे.

२३ सप्टेंबर २०२५ रोजी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. ती अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला, आणि आगामी प्रकल्पांवर चर्चा केली. सभेचा सूर सकारात्मक होता, आणि सर्वांनी एकत्र काम करण्याचे ठरवले. पण या खेळीमेळीच्या वातावरणानंतर केवळ काही दिवसांत घडलेल्या घटनांनी संस्थेतील शिस्त आणि परंपरेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहेत.

२३ सप्टेंबर २०२५ नंतर संस्थेचे वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी सामाजिक माध्यमांवरून माझ्या विरोधात असत्य आणि दिशाभूल करणारे संदेश प्रसारित करण्यास सुरुवात केली. त्यांनी संस्थेतील काही पदाधिकारी आणि सदस्यांना भ्रमित करून असंतोष निर्माण करण्याचा प्रयत्न केला. काहींना धमक्या देऊन त्यांचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न केला. या सर्व हालचालींचा उद्देश स्पष्ट होता तो म्हणजे संस्थेच्या वैध अध्यक्षाविरुद्ध असंतोष निर्माण झाल्याचा बनाव करून बेकायदेशीरपणे सत्ता हस्तगत करणे होय.

सदर सभेपूर्वी गव्हर्निंग काऊन्सील ने मंजूर केलेल्या संस्थेच्या घटनेतील दुरूस्त्यांवर विचार करून निर्णय घेणेसाठी २३ सप्टेंबर २०२५ रोजीची नियमित वार्षिक सभेच्यापूर्वी सकाळी ११.०० वाजता विशेष सर्वसाधारण सभा आयोजित केली होती.

संस्थेच्या प्रशासनाकडून सभासदांना दुरूस्तीसंबंधीचे प्रारूप उशीरा पाठवले गेले. त्यात त्रुटी व चुकाही राहील्या होत्या. एखादी दुरूस्ती मॅनेजिंग कमिटी ला माहीती होण्यापूर्वीच थेट सर्व सभासदांना पाठवण्यात आली. काही सभासदांनी पुरेसा वेळ मिळाला नसल्याने अधिक वेळ मिळावा अशी मागणी केली. अशी मागणी करणारे दोन–तीन जणच होते. परंतु सभेचा अध्यक्ष या नात्याने मी त्यांच्या भावनांचा सन्मान ठेवून विशेष सर्वसाधारण सभा तहकुबही केली.

त्यामुळे कोणतीही घटनादुरूस्ती झालीच नाही. तरीही एका तरतुदीची मॅनेजिंग कमिटी ला माहीती न दिल्याचा बहाणा करून वरीष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे यांनी सभा संकेत पायदळी तुडवून जे वर्तन केले. महाराष्ट्र चेंबर मध्ये कधीच न आलेला जातीवादाचा मुद्दा काढत प्रक्षोभक भाषण केले जे संस्थेच्या आजवरच्या परंपरेला काळीमा फासणारे होते. मलाही त्याचे त्याच पध्दतीने उत्तर देता आले असते, परंतु ते संस्थेच्या परंपरेला शोभले नसते, संस्थेची प्रतिमा मलिन होऊ नये म्हणून मी संयम ठेवला, आजही संयम ठेवुनच वागतो आहे.

**• मी राजीनामा दिल्याची अफवा**

रवींद्र माणगावे यांनी सर्वत्र पसरवले की मी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. मी स्पष्ट सांगतो, ही निव्वळ अफवा आहे. नियमानुसार अध्यक्षाचा राजीनामा लेखी स्वरूपात सेक्रेटरी जनरल यांचेकडे सादर करावा लागतो, त्यानंतर गव्हर्निंग काऊन्सीलची मंजुरी आणि विशेष सर्वसाधारण सभेचा मंजुरीचा ठराव आवश्यक असतो. अशी कोणतीही प्रक्रिया आजपर्यंत पार पडलेली नाही. त्यामुळे माझा राजीनामा दिला गेला आहे किंवा मी पद सोडले आहे, हा दावा बेकायदेशीर, असत्य आणि दिशाभूल करणारा आहे.

मी अधिकृतपणे न पाठवलेल्या ई–मेलचा उल्लेख केला जात आहे. त्याचवेळी सेक्रेटरीच्या नावाने मला राजीनाम्याचे प्रारूप पाठविले जाते. जे मी कधीही भरून दिलेलेच नाही. कोणत्याही प्रकारे मी राजीनामा दिलेलाच नाही. तर पुढचा प्रश्नच नाही.

**• स्वतःला अध्यक्ष घोषित करणे ;**
**संस्थेच्या इतिहासातील काळा अध्याय :**

कोणतीही संविधानिक प्रक्रिया न पाळता, नियमानुसार आवश्यक सभांचा निर्णय न घेता, रवींद्र माणगावे यांनी स्वतःला संस्थेचा अध्यक्ष म्हणून घोषित केले. कर्मचाऱ्यांवर दबाव आणला, आणि प्रसार माध्यमांमध्ये अध्यक्षपदी निवडीच्या खोट्या बातम्या प्रसिद्ध केल्या. माझ्या वयोवृध्द वडीलांची प्रकृती अचानक गंभीर झाल्याने मला अधिकाधिक काळ कोल्हापूरात रहावे लागल्याचा गैरफायदा घेऊन स्वतःच 'अध्यक्ष' म्हणून सत्कार स्विकारणे सुरू केले. संस्थेच्या शंभर वर्षांच्या गौरवशाली इतिहासात असा प्रकार कधीही झाला नव्हता. ही कृती केवळ वैयक्तिक स्वार्थाची नव्हे, तर संस्थेच्या प्रतिष्ठेवर झालेला हल्ला आहे.

**• संस्थेच्या परंपरेला धक्का लावणारी;**
**एका व्यक्तीची अधाशी महत्त्वाकांक्षा**

एखाद्या व्यक्तीची महत्त्वाकांक्षा जर संस्थेपेक्षा मोठी ठरली, तर त्यातून विनाशच जन्म घेतो. रवींद्र माणगावे यांच्या कृतींमधून हेच दिसून आले. त्यांनी संस्थेच्या लोकशाही रचनेवरच प्रहार केला आहे. संस्था ही व्यक्तीपेक्षा नेहमी मोठी असते. पण सध्या एक व्यक्ती त्या संस्थेच्या गौरवाला गालबोट लावण्याचा प्रयत्न करत आहे. अध्यक्षपद सन्मानाने मिळवायचे असते, बळजबरीने, अफवांनी किंवा दबावाने नव्हे. ही संस्था एका व्यक्तीच्या वैयक्तिक स्वार्थासाठी नव्हे, तर हजारो व्यापारी, उद्योजक आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी उभी आहे.

**• काही पदाधिकारी बळी पडले, पण सत्य अढळ आहे**

रवींद्र माणगावे यांच्या या बेकायदेशीर हालचालींना काही पदाधिकारी गैरसमजातून साथ देत आहेत. त्यांच्या मनात संभ्रम निर्माण केला गेला आहे. मात्र मी सर्वांना सांगू इच्छितो, सत्याला वेळ लागू शकतो, पण ते जिंकतेच. संस्थेच्या घटनेनुसार, माझा कार्यकाळ वैध आहे, आणि मी आजही अध्यक्ष म्हणून कामकाज करत आहे. कोणत्याही व्यक्तीला किंवा एखाद्या गटाला माझ्या पदाबाबत निर्णय घेण्याचा अधिकारच नाही.

**• मी कायदेशीर दाद मागितली आहे :**
**न्यायावर पूर्ण विश्वास**

संस्थेच्या प्रतिष्ठेला आणि शिस्तीला धक्का पोहोचवणाऱ्या या घटनांबाबत मी अध्यक्ष या नात्याने योग्य त्या ठिकाणी दाद मागितली आहे. संस्थेच्या घटनेनुसार आणि कायद्यातील तरतुदीनुसार आवश्यक त्या ठिकाणी तक्रारी दाखल केल्या आहेत. मला न्याय मिळेल, कारण सत्य माझ्या बाजूने आहे.

ही संस्था १०० वर्षांचा प्रवास पूर्ण करत आहे. हा केवळ इतिहास नव्हे, तर आपल्या सर्वांच्या श्रम, समर्पण आणि एकतेचे प्रतीक आहे. या संस्थेच्या मंचावरून महाराष्ट्रातील अनेक दिग्गजांनी काम केले आहे. त्यांनी मतभेद असले तरी कधीही संस्थेच्या प्रतिष्ठेचा अपमान केला नाही. आज मात्र ही परंपरा धोक्यात आहे. संस्थेचा गौरव राखण्यासाठी, आपण सर्वांनी जागृत राहणे आवश्यक आहे. संविधान, नियम, आणि लोकशाही पद्धतींचे पालन करणे हाच आपला धर्म आहे.

मी सर्व सदस्यांना नम्रपणे आवाहन करतो की, संस्थेच्या आणि पर्यायाने राज्यातील उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी तसेच प्रगतीसाठी आपण एकत्र राहूया. अफवा, गटबाजी आणि वैयक्तिक स्वार्थ यांना थारा देऊ नका. आज गरज आहे ती एकतेची, संयमाची आणि परस्पर सन्मानाची. संस्था आपली सामूहिक ओळख आहे. तिला नष्ट होऊ देऊ नका.

मी कुणाच्याही विरोधात नाही. मी कधीही वैयक्तिक वैर बाळगत नाही. माझी भूमिका केवळ संस्थेच्या संविधानाचे, परंपरेचे आणि सन्मानाचे रक्षण करणे इतकीच आहे. माझा प्रत्येक निर्णय संस्थेच्या हितासाठीच असेल. रवींद्र माणगावे किंवा इतर कोणालाही माझ्या विरोधात बोलण्याचा अधिकार आहे, पण बेकायदेशीररीत्या पद मिळवण्याचा अधिकार कुणालाही नाही. संविधानाच्या चौकटीत राहून मतभेद व्यक्त केले तर मी त्याचा सन्मान करेन. पण संस्था उद्ध्वस्त करणाऱ्या कृती कधीही सहन केल्या जाणार नाहीत.

**• सदस्यांना आवाहन : सत्याच्या पाठीशी उभे राहा**

संस्था ही केवळ एका इमारतीत, पदांमध्ये किंवा फाइल्समध्ये नाही. ती आपल्या सर्वांच्या विश्वासातून उभी राहते. आज या विश्वासावरच आघात झाला आहे. म्हणून मी सर्व सदस्यांना स्पष्टपणे सांगतो, सत्याच्या बाजूने उभे राहा. संस्थेच्या संविधानावर विश्वास ठेवा. अफवांना बळी पडू नका. संस्थेच्या शंभर वर्षांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करणे हीच खरी सेवा आहे.

ही लढाई वैयक्तिक नसून, संस्थेच्या अस्तित्वासाठी आहे. ही संस्था आपल्या सर्वांची आहे. ती कोणाच्याही वैयक्तिक महत्त्वाकांक्षेचा खेळ नाही. संस्थेच्या इतिहासात प्रथमच जे घडले आहे, ते दुर्दैवी आहे, पण मला विश्वास आहे की संस्थेचे सदस्य शहाणपणाने, न्यायाच्या आणि सत्याच्या बाजूने उभे राहतील.

**अध्यक्ष म्हणून संस्थेच्या गौरवशाली परंपरेचे रक्षण करणे, तिचा सन्मान राखणे आणि तिच्या सदस्यांच्या हिताचे संरक्षण करणे, हाच माझा उद्देश आहे. आपण सर्वजण एकत्र राहू. संविधान, शिस्त आणि परंपरा, या तिन्हींचे पालन करून काम करू.**

**- ललित गांधी**

**अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर**

## ललित गांधी यांच्या वर्ष २०२५-२०२६ या एक वर्षासाठी 'अध्यक्ष'पदी झालेल्या निवडीचे प्रमाणपत्र.



MACCIA

Apex Chamber of the State

CELEBRATING 100 YEARS

**Maharashtra Chamber of Commerce, Industry And Agriculture**

[APEX CHAMBER OF THE STATE OF MAHARASHTRA]

*We are pleased to inform you that,*

***Mr. Lalit Sakalchand Gandhi***


*You Have Been Elected Unopposed As '**president**' Of*
*The Maharashtra Chamber Of Commerce, Industry & Agriculture*
*For The Year 2025-2026.*
*I Wish To Congratulate You And Looking Forward To*
*Your Valuable Contribution Towards Chamber's Various Activities.*

**Neelakshi Radhakrishnan**
Returning Officer & Secretary General

*Mumbai, Date : 20/06/2025*

# अध्यक्षपदी ललित गांधी यांचे एक वर्षासाठी निवड झाल्याचे घोषणापत्र

Founder



**Sheth Walchand Hirachand**

Patriot & Pioneer of Swadeshi Car, Aircraft & Shipping in India

**Maharashtra Chamber of Com. Industry & Agriculture**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲंड ॲग्रीकल्चर

MACCIA 100 — Apex Chamber of the State — 1927-2027

**Head Office :** Oricon House, 6th Floor, Maharashtra Chamber of Commerce Marg, Kala Ghoda, Fort, Mumbai - 400 001
**Ph.:** 022 - 67395800 (30 Lines) 22855859, 5860. **Fax :** 022-22855861 **Email :** maccia@maccia.org.in **Web:** www.maccia.org.in

5th July 2025

Shri. Lalit S Gandhi

Namaste,

I am pleased to inform you that upon the completion of scrutiny and in accordance with the prescribed rules of the Chamber, only one valid nomination was received for the post of **President of the Chamber for the year 2025-26**.

Since no other nominations were filed for this position, I hereby declare that **you have been elected unopposed** to the post of **President of the Chamber for the term 2025-26**.

On behalf of the Chamber,I extend to you my warm congratulations and look forward to your contribution in the Chamber's initiatives.

Yours sincerely,

**Neelakshi Radhakrishnan**


*Returning Officer/ Secretary General*

President
**Lalit Gandhi**
Sr. Vice President
**Ravindra Mangave**
Vice President
**Karunkar Shetty**
**Shankar Shinde**
**Sanjay Sonawane**
**Sangeeta Patil**
**Ramakant Malu**
**Dilip Gupta**
**Praful Malani**
**Shrikrishna Parab**
Chairman - Trust Board
**Ashish Pednekar**
Permanent Invitee
**Vijay Vedmutha**
**Kantilal Chopda**
Secretary General
**Neelakshi Radhakrishnan**

**President Email :** president@maccia.org.in

# अध्यक्ष व वरिष्ठ उपाध्यक्ष यांच्या निवडीचे अधिकृत घोषणापत्र

Founder



Seth Walchand Hirachand

**Maharashtra Chamber of Com. Industry & Agriculture**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर

MACCIA 100

Apex Chamber of the State

**Head Office :** Oricon House, 6th Floor, Maharashtra Chamber of Commerce Marg, Kala Ghoda, Fort, Mumbai - 400 001
**Ph.:** 022 - 67395800 (30 Lines) 22855859, 5860. **Fax :** 022-22855861 **Email :** maccia@maccia.org.in **Web:** www.maccia.org.in

**MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY AND AGRICULTURE**
**Election result for the post of President & Senior Vice President for the term 2025-2026**

As per the Constitution and Rules and Regulations of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture, the circular inviting the nominations for the various posts was issued on 27th May 2025. The nomination papers were received on 9th June 2025 upto 5.00 p.m. The scrutiny of the nomination papers were held on 12th & 13th June 2025. The withdrawal of nominations was held on 20th June 2025. The report of the Scrutiny Committee of Elections of the President & Senior Vice President for the term 2025-2026 is as under :-

1. **President Post**

For the **Post of President**, only one nomination was received from Mr. Lalit Gandhi, Kolhapur had filed his nomination. This form was complete in all respects. Hence, **Mr. Lalit Gandhi** is declared elected unopposed as President of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture for the term 2025-2026.

2. **Senior Vice President Post**

For the **one post of Senior Vice President**, following Three nominations were received:

| | | |
|---|---|---|
| 1. | Mr. Ravindra Mangave | Valid |
| 2. | Mr. Anilkumar Lodha | Valid |
| 3. | Mr. Karunakar shetty | Valid |

Out of these three valid nominations, Mr. Anilkumar Lodha & Mr. Karunakar Shetty withdrew their nominations. Hence, **Mr. Ravindra Mangave** has been declared elected unopposed as the Sr. Vice President of the Chamber for the term 2025-2026.

Date: 5th July 2025
Place: Mumbai

Neelakshi Radhakrishnan
(Secretary General & Returning Officer)

President
Lalit Gandhi
Sr. Vice President
Ravindra Mangave
Vice President
Karunkar Shetty
Shankar Shinde
Sanjay Sonavane
Sangeeta Patil
Ramakant Malu
Dilip Gupta
Praful Malani
Shrikrishna Parab
Chairman - Trust Board
Ashish Pednekar
Permanent Invitee
Vijay Vedmutha
Kantilal Chopda
Secretary General
Neelakshi Radhakrishnan

**President Email :** president@maccia.org.in

# विकासपथावरील वाटचालीचा, धावता आढावा...



**नाशिक :** महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासोबत बैठक. बैठकीत वीजदर, अनियमित वीजपुरवठा, निर्यात विषयी वाहतूक समस्या, आयटी हब, औद्योगिक वसाहतीमधील पायाभूत सुविधांविषयी असलेल्या समस्या, ट्रक टर्मिनल, विविध करांसंबंधी असलेल्या अडचणी, बाजार समिती कायद्याविषयीच्या अडचणी आणि समस्या, महानगरपालिकेचे परवाना धोरण यासह नाशिकमधील आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर कायमस्वरुपी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासंबंधी चर्चा. यावेळी उद्योगमंत्र्यांना निवेदनही देण्यात आले.

**कोल्हापूर :** उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत कोल्हापूर जिल्ह्यातील प्रमुख उद्योजक, व्यापारी यांच्यासोबत बैठक. येथील औद्योगिक वसाहतीमधील अनेक वर्षे प्रलंबित असलेले प्रश्नक, समस्या सोडवल्याबद्दल तसेच उद्योजकांचे प्रलंबित अनुदान वितरित केल्याबद्दल उद्योगमंत्र्यांचे आभार मानण्यात आले. यावेळी कोल्हापुरातील औद्योगिक वसाहतींचा विस्तार, वीज दरवाढ, जागा हस्तांतरणासाठी लागणारा जीएसटी रद्द करणे, इलेक्टॉनिक पार्कला मंजुरी तसेच पायाभूत सुविधांचा विस्तार आदी मागण्यांचे निवेदन देण्यात आले.





**पनवेल :** पनवेल सहकारी औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष विजय लोखंडे यांच्यासोबत चर्चा. यावेळी या परिसरात महाराष्ट्र चेंबरच्या कार्याचा विस्तार करण्यासंबंधी चर्चा करण्यात आली. तसेच औद्योगिक वसाहतीमधील निवडक कंपन्यांना भेट देण्यात आली.

**मुंबई :** नवी मुंबई येथील एका पंचताराकित हॉटेलमध्ये आयोजित रेफकॉन २०२४ या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन. परिषदेत रेफ्रिजशन, वातानुलित यंत्रणा आणि कोल्ड स्टोरेज उद्योग यावर चर्चा विनमय करण्यात आली.





मुंबई : उद्योग विभाग महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि महाराष्ट्र चेंबरच्या संयुक्त विद्यमाने **मायटेक्स २०२४** चे यशस्वी आयोजन. यावेळी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सीईओ श्रीमती आर. विमला, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या उपस्थितीत उदघाटन करण्यात आले. यावेळी चेंबरचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, सौ. शुभांगी तिरोडकर, श्रीकांत परब, सौ. मीनल मोहाडीकर आणि चेंबरचे सभासद उपस्थित होते.

## पालघर कार्यालय शुभारंभ

**पालघर** : महाराष्ट्र चेंबरच्या पालघर जिल्हा कार्यालयाचे उद्घाटन. यावेळी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, आमदार हितेंद्र ठाकूर, माजी महापौर तथा उद्योजक राजीव पाटील, दीपा राऊत आणि एमडीएफ सेंटरचे सहाय्यक संचालक सुनील खुजनारे आदी मान्यवर उपस्थित होते.




## बारामती कार्यालय शुभारंभ



बारामतीमध्ये महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे विभागीय कार्यालय सुरु झाले या कार्यालयाच्या माध्यमातून स्थानिक व्यापारी उद्योजकांना प्रोत्साहन मिळेल व उद्योगांना चालना मिळेल. इंद्रायणी, पवना नदी प्रदूषण मुक्त करणार, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील उद्योजकांसाठी रेड कार्पेट केले असून गर्जे मराठी या संस्थेबरोबर सामंजस्य करार केला असून तो खूप महत्त्वाचा आहे. तसेच बारामतीकरांना एमआयडीसी चे विभागीय कार्यालय मंजूर करण्यात आले आहे व कामगारांच्या ईएसआईसी हॉस्पिटलसाठी आठ एकर जागा मंजूर केली असल्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी महाराष्ट्र चेंबरच्या बारामती विभागीय कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी सांगितले.

## बिझनेस नेटवर्क फोरम ची सुरूवात

नाशिकच्या पवित्र भूमीत अर्धशतकापूर्वी महाराष्ट्र चेंबरची उत्तर महाराष्ट्र शाखा सुरु झाल्याने विकासनोमुख कार्याचा एक रचनात्मक पाया रचला गेला. गेल्या पाच दशकांमध्ये एकूणच झालेले आर्थिक क्षेत्रालातील स्थित्यांतरे आणि काळाची नवी पाऊले लक्षात घेऊन याच पवित्र भूमीत व्यापार विकासाच्या आणि वाढीच्या वैयक्तिक आणि समूह स्तरावर संधी देणाऱ्या मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमच्या माध्यमातून एक नवे सशक्त पाऊल पुन्हा उचलले गेले आहे. यामुळे महाराष्ट्र चेंबरच्या सभासदांना केवळ महाराष्ट्र राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशात आणि परदेशातही व्यापार संपर्क स्थापित करता येणार आहे.






## शेतकरी उद्योजकता विकास मेळावा

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चर, मुंबई आणि धुळे व्यापारी महासंघाच्या सहकार्याने दिवंगत हंसराजजी अग्रवाल यांच्या स्मरणार्थ शेतकरी उद्योजकता विकास मेळावा आयोजित करण्यात आला होता. देशातील शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्यात महाराष्ट्र चेंबरचे मोठे योगदान आहे. या वेळी महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळाने केलेल्या इंडोनेशिया दौरा आणि गुंतवणूकीच्या संधीची माहिती दिली. **रावल उद्योग समूहाचे सरकार रावल म्हणाले, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने शेतकरी उद्योजकता मेळावा घेतल्याने शेतकरी उदयोजकांत चैतन्य निर्माण झाले आहे.**

भारत हा कृषिप्रधान देश असून जवळपास ७०% लोक शेतीवर अवलंबून आहेत. सध्या शेती करणे आव्हानात्मक बनले असून शेतीसोबत उद्योग व्यवसाय काळाची गरज आहे. शेतकरी यांनी स्वतः चा असा शेतीशी निगडीत प्रक्रिया उद्योग सुरू करावा.



## केंद्रीय राज्यमंत्री चौधरी यांना आयकर विषयी निवदेन

**नवी दिल्ली :** आयकर मधील बदलाने सुक्ष्म व लघुउद्योग पेमेंट पद्धतीत झालेला परिणाम आणि यातील अपेक्षित बदल याविषयी केंद्रीय वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांची भेट घेतली. यावेळी त्यांना महाराष्ट्र चेंबरच्यावतीने विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी खासदार धैर्यशील मानेही उपस्थित होते.

## मुक्त विद्यापीठ आणि महाराष्ट्र चेंबर सामंजस्य करार

**नाशिक :** येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु संजीव सोनवणे यांची भेट. विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याविषयी मुक्त विद्यापीठ आणि महाराष्ट्र चेंबर सामंजस्य करार करण्याविषयी चर्चा.





## कोल्हापूर विमानतळास छ. राजाराम महाराज यांचे नाव देण्याची मागणी

**कोल्हापूर :** येथील विमानतळास छत्रपती राजाराम महाराजांचे नाव द्यावे या मागणीसाठी तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन सादर. यावेळी माजी खासदार संजय मंडलिक, खासदार धैर्यशील माने, माजी आमदार प्रकाश आवाडे, माजी मंत्री राजेश पाटील यड्रावकर आदी मान्यवर उपस्थित होते.




**मुंबई :** महाराष्ट्र चेंबरच्या मुख्यालयात कौशल्य विकास आणि उद्योजक समन्वय बैठकीचे आयोजन. यावेळी केंद्र सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाचे सचिव अतुल कुमार तिवारी, राज्याच्या कौशल्य विकास विभागाच्या आयुक्त श्रीमती निधी चौधरी, नाशिक महसूल विभाग आयुक्त डॉ. प्रविण गेडाम, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, उपाध्यक्ष संजय सोनवणे, सौ. संगीता पाटील, करुणाकर शेट्टी, प्रफुल्ल, मालाणी, जितेंद्र ठाकुर, कुणाल पाटील, प्रमोद खैरनार आदी मान्यवर उपस्थित होते.

**नंदूरबार :** नंदूरबार डिस्ट्रिक्टआ इंडस्ट्रियल असोसिएशन आणि नंदूरबार डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने 'अध्यक्षांशी संवाद' कार्यक्रमास उपस्थिती. यावेळी महाराष्ट्र चेंबरच्या उपाध्यक्ष सौ. संगीता पाटील, विश्र्वस्त कैलास अग्रवाल, पिकेश अग्रवाल, नंदूरबार डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट कौन्सिलचे आशिष वाणी, उद्योजक कृष्णा अग्रवाल, लघु उद्योग भारतीचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र चौधरी, प्रकाश पाटील, ईश्वर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.







**अमळनेर :** अमळनेर व्यापारी अडत असोसिएशन, अमळनेर व्यापारी महासंघ, अमळनेर एमआयडीसी संघटना यांच्यावतीने येथील बाजार समितीच्या कार्यालयात व्यापारी आणि उद्योजकांशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन. यावेळी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अमळनेरच्या माजी नगराध्यक्ष सौ. जयताई पाटील, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, सौ. संगीता पाटील, संजय सोनवणे, जिल्हा बँकेच्या माजी संचालक सौ. तिलोत्तमाताई पाटील आदी उपस्थित होते.

## धुळे येथे व्यापारी उद्योजक परिषदेचे यशस्वी आयोजन

**धुळे :** येथे व्यापारी उद्योजक परिषदेचे आयोजन. यावेळी महाराष्ट्र चेंबरचे ट्रस्टी महेंद्र अगरवाल यांचा सत्कार करण्यात आला. या परिषदेला महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, उपाध्यक्ष संजय सोनवणे, सौ. संगीता पाटील, नितिन बंग, कैलास अग्रवाल, जीसी मेंबर अरुण केले, विष्णुकांत फाफट, राम रोहिरा आदी मान्यवर उपस्थित होते.



# चेंबरच्या इतिहासात प्रथमच सर्व विभागीय उपाध्यक्ष व जीसी मेंबर यांचे पॅनेल डिस्कशन्स च्या माध्यमातुन राज्याच्या विकासाचा रोडमॅप सादर




◆ उपाध्यक्ष (१) संजय सोनवणे, उपाध्यक्ष (२) संगीता पाटील व अन्य सदस्य




◆ उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी व अन्य सदस्य




◆ उपाध्यक्ष प्रफुल्ल मालाणी व अन्य सदस्य




◆ उपाध्यक्ष श्रीकृष्ण परब व अन्य सदस्य




◆ उपाध्यक्ष शंकर शेट्टी व अन्य सदस्य




◆ उपाध्यक्ष दिलीप गुप्ता व अन्य सदस्य



◆ अध्यक्ष ललित गांधी यांनी पूर्णवेळ सभागृहात बसून सर्व विभागाचे पॅनेल चे मुद्दे नोंद करून घेतले.




◆ नवनियुक्त जीसी मेंबर व महाराष्ट्र सरकारच्या आर्थिक सल्लागार समितीचे सदस्य प्रसन्न देशपांडे



**नवी दिल्ली :** महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय कौशल्य विकास व उद्योग मंत्री जयंत चौधरी यांची भेट घेतली. यावेळी महाराष्ट्र राज्यातील उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्रातील उद्योजकांना भेडसावणाऱ्या समस्या व अडचणी याविषयी चर्चा केली. तसेच कर रचना आणि पायाभूत सुविधा निर्माण करण्याविषयी निवेदन सादर केले. महाराष्ट्र चेंबर च्या सहकार्याने महाराष्ट्रात राष्ट्रीय कौशल्य विकास व उद्योजकता परिषदेचे आयोजन करण्याचा संकल्प व्यक्त केला. यापरिषदेला केंद्र सरकारने सहकार्य करावे अशी मागणीही ललित गांधी यांनी यावेळी केंद्रीय मंत्र्यांकडे केली.

## बारामतीत 'मराठी पाऊल पुढे' उत्साहात

**बारामती :** महाराष्ट चेंबरच्या वतीने येथे मराठी पाऊल पडते पुढे या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन. यावेळी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, दिलीप गुप्ता, नूतन जीसी सदस्य शरद सूर्यवंशी, चंद्रकांत ठक्कर, डॉ. विजयकुमार मालापुरे, जगदीश पंजाबी, महेश ओसवाल आदी मान्यवर उपस्थित होते.





**मुंबई :** व्यापाऱ्यांचे प्रश्न तातडीने आणि प्राधान्याने सोडवावेत यासाठी राज्य व्यापारी कृती समितीच्यावतीने २७ ऑगस्ट रोजी एक दिवसीय राज्यव्यापी व्यापार बंद आंदोलन. या पार्श्वभूमीवर तत्कालिन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत येथील सह्याद्री शासकीय अतिथीगृह येथे उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन. यावेळी राज्यातील व्यापाऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या, अडचणी आणि प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, फॅमचे सचिव प्रितेश शहा, ग्रोमाचे अध्यक्ष भीमजी भानुशाली. सचिव नितेश वीरा, पुना मर्चंट चेंबरचे माजी अध्यक्ष प्रविण चोरबोले, अनित भन्साली आदी मान्यवर उपस्थित होते.

**सोलापूर :** एपीएमसी मधील व्यापाऱ्यांच्या विविध अडचणी बाबत सोलापूर जिल्हास्तरीय व्यापारी परिषद आयोजित करण्यात आले होते. श्री ललित गांधी यांनी व्यापाऱ्यांनी आपली एकजूट कायम ठेवावी, संघटन शक्ती वाढवावे, संघटन शक्तीला पर्याय नाही, तेंव्हा आपण आपले आपसातील मतभेद विसरून महाराष्ट्रातील सर्व प्रकारचे व्यापार करणारे व्यापाऱ्यांनी एकत्रित यावे आणि आपला दिनांक २७ ऑगस्ट २०२४ रोजीचा महाराष्ट्र राजव्यापी एक दिवसाचा लक्षणीक बंद यशस्वी करावा असे आग्रहाची विनंती या परिषदेत केली.






◆ **महाराष्ट्र राज्याचे उद्‌योग मंत्री मान. नाम. उदयजी सामंत यांच्या हस्ते अध्यक्षीय ट्रॉफी देऊन २०२४-२०२५ साठी अध्यक्ष ललित गांधी यांना पदभार देण्यात आला. सोबत वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, ट्रस्ट बोर्ड चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी,रमाकांत मालु, दिलीप गुप्ता, शंकर शिंदे, प्रफुल मालाणी, श्रीकृष्ण परब, निमंत्रित सदस्य विजय वेदमुथा, कांतीलाल चोपडा, माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा, सेक्रेटरी जनरल सुरेश घोरपडे आदी मान्यवर.**

---




**मुंबई :** केंद्रिय राज्यमंत्री दर्जा असलेले व नीती आयोगाचे (दिल्ली) सदस्य डॉ. अरविंद विरमणी यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रीकल्चरच्या मुख्यालयास भेट देऊन निर्यातदार, उद्योजक, व्यापारी यांच्याशी संवाद साधून निर्यातीसंदर्भातील तसेच व्यापार उद्योगासंदर्भांतील सद्यस्थितीत असलेल्या विविध पॉलिसी तसेच समस्या यांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींचा आढावा घेतला. तसेच विकसित भारत या संकल्पनेला अधिक बळ देण्यासाठी केंद्र शासनाला निर्यात वृद्धी, व्यापार, उद्योग क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आवश्यक अशा सुचना तसेच नवीन ध्येयधोरणे याचा अंतर्भाव करण्यासाठी केंद्र शासनाला सल्ला देणार असल्याचे डॉ. अरविंद विरमानी यांनी नमूद केले.

---

**मुंबई :** महाराष्ट्र हे निर्याती मधील देशातील अग्रेसर राज्य असून या राज्यातील आयात निर्यात अशी निगडित व्यापारी उद्योजकांच्या विविध समस्या प्राधान्याने दूर केल्या जातील अशी ग्वाही डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड चे महासंचालक श्री संतोष कुमार सारंगी यांनी दिली महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज तर्फे श्री सारंगी यांच्या मुंबई दौऱ्याप्रसंगी अध्यक्ष ललित गांधी व उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी यांनी भेट घेऊन आंतरराष्ट्रीय व्यापार करणाऱ्या सभासदांच्या आयात निर्यातीसंबंधी विविध स्पष्ट संबंधी सविस्तर चर्चा करून निवेदन सादर केले होते.






## कोल्हापूरात राष्ट्रीय कर परिषदेचे आयोजन

**कोल्हापूर :** येथे करदात्यांसाठी कर प्रक्रिया सुलभ असावी यासाठी नॅशनल टॅक्स प्रॅक्टीशनर्स फेडरेशन आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय राष्ट्रीय कर परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच टॅक्स प्रॅक्टीशनर्स फेडरेशनचे अध्यक्ष नारायण प्रसाद जैन उद्घाटक म्हणून उपस्थित होते.

या परिषदेत करदात्यांना कर भरताना येणाऱ्या अडचणी, समस्या आणि प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. तसेच कर भरताना घ्यावयाची काळजी, आवश्यक कागदपत्रे आदींची माहिती देण्यात आली. याचबरोबर केंद्र आणि राज्य शासनाच्या करविषयक धोरणांची आणि सवलतींचीही माहिती देण्यात आली. या परिषदेस नॅशनल टॅक्स प्रॅक्टीशनर्स फेडरेशनचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विनायक पाटकर, महेश माडखोलकर, नरेंद्र सोनवणे, प्रविण शिंदे, अनिल माथुर, माजी राष्ट्रीय अध्यक्ष पी. सी. जोशी, निकिता बधेका, श्रीनिवास राव, समीर जानी, प्रसन्न देशपांडे यांच्यासह सुमारे २५० पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.






◆ **महाराष्ट्र शासनाच्या 'महाराष्ट्राची उद्योगभरारी' कार्यक्रमात नाशिक, जळगाव येथे सहभाग**

## पेपर कप उत्पादन, विक्री बंदी उठवण्यात महाराष्ट्र चेंबरला यश

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारने पेपर कप उत्पादन आणि विक्रीवर बंदी घातलेली नाही. याबाबत शासनाने कोणताही आदेश काढला नसल्याची माहिती महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना दिली. पेपर कपांसंबंधी उलटसुलट बातम्या प्रसिद्ध झाल्याने उत्पादक आणि विक्रेते यांच्यात संभ्रमाचे वातावरण तयार झाल्याच्या पार्श्वभूमीवर ललित गांधी यांनी आरोग्यमंत्र्यांची भेट घेऊन वस्तुस्थिती सांगितली. पेपर कपातील प्लास्टीक कोटींगमुळे कॅन्सर होऊ शकतो, अशा आशयाच्या बातम्या काही वृत्तवाहिन्यांनी दाखवल्याने पेपर कप उत्पादन उद्योग संकटात सापडला होता. यामुळे उत्पादक, विक्रेते आणि या उद्योगात काम करणाऱ्या कामगारांत चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.



या पार्श्वभूमीवर ललित गांधी यांनी पुढाकार घेऊन आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेऊन चर्चा केली. आरोग्यमंत्र्यांनी महाराष्ट्र चेंबरची भूमिका आणि अडचड समजावून घेतली. तसेच यासाठी तज्ज्ञांची समिती नेमण्याचे आश्वासन दिले. यावेळी सिद्धार्थ सोमाणी, तुषार बंब, संतोष झंवर, सचिन धुत आदी मान्यवर उपस्थित होते.

# झी २४ उद्योग संमेलनात ललित गांधी यांना उद्योगरत्न

**मुंबई :** येथे झी २४ वृत्तवाहिनीच्यावतीने उद्योग संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांना उद्योगरत्न हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या संमेलनात महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत, कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, चेंबरचे माजी अध्यक्ष हेमंत राठी, आशिष पेडणेकर, वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, श्रीकृष्ण परब, रमाकांत मालू, जीसी सदस्य संजय लुणावत, शरद सूर्यवंशी, संदीप सोमवंशी, रंजना एरणकर यांच्यासह उद्योग, व्यापार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या



सोहळ्यात मिलिंद कांबळे, संजय यादवराव, चंद्रकांत साळुंखे यांनाही उद्योगरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले.




**नाशिक :** येथे सिम्बायोसिस इन्सिटीट्यूटच्यावतीने तत्व (TTTV)२०२४ चे आयोजन करण्यात आले होते. याच्या उद्घाटन प्रसंगी सिम्बायोसिसच्या संचालक डॉ. वंदना सोनवणी, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष संजय सोनवणे, सचिन शहा, मंदार वाईकर, शीतल ठाकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी 'भारताचा आर्थिक मार्ग आणि महाराष्ट्रातील लॉजिस्टीकची व्याप्ती' या विषयावर ललित गांधी मार्गदर्शन केले. तसेच मल्टी मॉडेल ट्रान्सपोर्ट सिस्टीम, कोल्ड स्टोरेज चेन आणि स्मार्ट वेअरहाऊस यावरही गांधी यांनी प्रकाश टाकला. यावेळी व्यवस्थापन क्षेत्रातील कार्यप्रक्रिया, पुरवठा साखळी आणि लॉजिस्टीक यावर विचारमंथन करण्यात आले. यावेळी जिंदाल स्टील अँड पॉवर लि. चे अनिमेश गुप्ता, करिअर एचव्हीएसीचे अजय सिक्का, डाबरचे सम्राट सहगल, अल्ट्राटेकचे अंजन सेन, पराग मिल्कचे गजानन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

**पूणे :** 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे जे स्वप्न पाहिले आहे त्यात महाराष्ट्राकडून एक ट्रिलियनचे योगदान अपेक्षित आहे. पंतप्रधानांच्या स्वप्नपूर्तीसाठी महाराष्ट्र भरीव योगदान देईल,' असा विश्वास पणन व राजशिष्टाचार राज्य मंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला. नवनियुक्त मंत्री, खासदार आणि नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडा-युवक कल्याण आणि अल्पसंख्याक मंत्री दत्तात्रय भरणे, नगर विकास राज्य मंत्री माधुरी मिसाळ, राज्यसभेच्या खासदार मेधा कुलकर्णी, महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांचा सन्मान करण्यात आला. आमदार चेतन तुपे, आमदार हेमंत रासने, आमदार भीमराव तापकीर यांचाही सन्मान करण्यात आला.





**मुंबई** : महाराष्ट्रातील उद्योग, व्यापार आणि शेती क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर या शतकपूर्ती संस्थेच्या वतीने अध्यक्ष ललित गांधी यांनी भारताचे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांची मुंबईच्या गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमध्ये सदिच्छा भेट घेतली.

या भेटीत कोल्हापूर खंडपीठाच्या स्थापनेविषयी अधिकृत मागणी सादर करताना, ललित गांधी यांनी पश्चिम महाराष्ट्रातील जनतेच्या दीर्घकालीन न्यायिक अपेक्षांची ठळक मांडणी केली. यावर उत्तर देताना सरन्यायाधीश न्या. गवई यांनी स्पष्टपणे सांगितले: **''मी गेली पाच वर्षे कोल्हापूर खंडपीठाच्या बाजूने आहे.''**

---

**मुंबई** : महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्राला सातत्याने अव्वलस्थानी ठेवण्यासाठी राज्य सरकार कटीबध्द असुन उद्योग क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी कमीत कमी नियंत्रणे ठेवुन उद्योग प्रेरक वातावरण निर्मितीसाठी राज्यातील उद्योग क्षेत्राची शिखर संस्था 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' ने तसेच अन्य संस्थानी दिलेल्या सुचनांचा सकारात्मक विचार करून सुधारणा केल्या जातील अशी ग्वाही महाराष्ट्राचे मुख्य सचिव राजेश मीणा यांनी दिली.



---




**नाशिक** : येथे सिम्बायोसिस इन्सिटीट्यूटच्यावतीने तत्व (TTTV)२०२४ चे आयोजन करण्यात आले होते. याच्या उद्घाटन प्रसंगी सिम्बायोसिसच्या संचालक डॉ. वंदना सोनवणी, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष संजय सोनवणे, सचिन शहा, मंदार वाईकर, शीतल ठाकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी 'भारताचा आर्थिक मार्ग आणि महाराष्ट्रातील लॉजिस्टीकची व्याप्ती' या विषयावर ललित गांधी मार्गदर्शन केले. तसेच मल्टी मॉडेल ट्रान्सपोर्ट सिस्टीम, कोल्ड स्टोरेज चेन आणि स्मार्ट वेअरहाऊस यावरही गांधी यांनी प्रकाश टाकला. यावेळी व्यवस्थापन क्षेत्रातील कार्यप्रक्रिया, पुरवठा साखळी आणि लॉजिस्टीक यावर विचारमंथन करण्यात आले. यावेळी जिंदाल स्टील अँड पॉवर लि. चे अनिमेश गुप्ता, करिअर एचव्हीएसीचे अजय सिक्का, डाबरचे सम्राट सहगल, अल्ट्राटेकचे अंजन सेन, पराग मिल्कचे गजानन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

---

**शेती ही संस्कृती आणि सभ्यतेचे मूळ आहे.**
**- डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम**

**उद्योग उभारायचे असतील तर शिक्षण आणि तंत्रज्ञान या दोन्हींची सांगड घालावी लागते.**
**- अझीम प्रेमजी,** माजी चेअरमन - विप्रो






## महाराष्ट्र चेंबरच्या शताब्दी महोत्सवी वर्ष सोहळ्याचा दिमाखात शुभारंभ

# महाराष्ट्र चेंबरच्या अध्यक्षपदी ललित गांधी यांची सलग चौथ्यांदा फेरनिवड

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते पदभार स्विकारला

**मुंबई :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रिज अँड ॲग्रिकल्चरच्या शताब्दी वर्ष महोत्सवाचा शुभारंभ, चेंबरच्या नुतनीकरण मुख्यालयाचे उद्घाटन आणि सहकारी व शासकीय औद्योगिक वसाहती राज्यस्तरीय परिषदेचे उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्रातील उद्योग, व्यापार, कृषि उद्योग क्षेत्राची शिखर संस्था म्हणून कार्य करणार्या ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर’ च्या अध्यक्षपदी ललित गांधी यांची सलग चौथ्यांदा बिनविरोध फेरनिवड झाली असुन केंद्रीय गृह व सहकारीता मंत्री नाम. अमित शाह यांच्या हस्ते त्यांना प्रेसीडेन्शीअल कप प्रदान करून अध्यक्षपदाचा कार्यभार प्रदान करण्यात आला.

येथील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये आयोजित सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत, कौशल्य, रोजगार व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, उपाध्यक्ष प्रफुल्ल मालानी, करुणाकर शेट्टी, संजय सोनावणे, रमाकांत मालु, व्यवस्थापन समिती सदस्य विजय वेदमुथा, कांतीलाल चोपडा, सहकार्यवाह निलाक्षी राधाकृष्णन आदी मान्यवर उपस्थित होते.

## कोल्हापुरी चप्पल वाद; ‘महाराष्ट्र चेंबर’ चा आक्षेप, ‘प्राडा’ चा सकारात्मक प्रतिसाद!



**कोल्हापूर / मुंबई:** महाराष्ट्राचे पारंपरिक आणि सांस्कृतिक वैभव असलेल्या ’कोल्हापुरी चप्पल’ संदर्भात इटालियन फॅशन ब्रँड ’प्राडा’ (झीरवर) सोबत झालेल्या वादावर आता सकारात्मक तोडगा निघाला आहे. प्राडाने आपल्या उत्पादनासाठी कोल्हापुरी चप्पलच्या पारंपरिक डिझाईनचा आधार घेतल्याची कबुली दिली असून, या वारसा आणि कारागिरांना मदतीचे आश्र्वासन दिले आहे. हा महत्त्वपूर्ण बदल घडवून आणण्यात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्तक्षेपामुळे यश मिळाले आहे.

’प्राडा’ या जागतिक फॅशन ब्रँडने ’मेंस फॅशन शो’मध्ये एक सँडल प्रदर्शित केली होती, जी थेट कोल्हापुरी चप्पलच्या डिझाईनची नक्कल असल्याचा आक्षेप ललित गांधी यांनी घेतला. कोल्हापूरची ओळख आणि महाराष्ट्राची शान असलेल्या चप्पलच्या डिझाईनची नक्कल करून ती आंतरराष्ट्रीय बाजारात ’प्राडा’ या नावाने आणि उच्च दरात विकली जात असल्याचे समोर आले. या गंभीर प्रकाराची नोंद घेत, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष या नात्याने ललित गांधी यांनी तातडीने ’प्राडा’च्या भारतीय शाखेच्या संचालकांना पत्र पाठवून, तीव्र शब्दांत आपला आक्षेप नोंदवला. कोल्हापुरी चप्पलच्या कारागिरांना न्याय मिळावा आणि त्यांच्या हक्काचे संरक्षण व्हावे, अशी त्यांनी मागणी केली. या पत्रामुळेच प्राडा कंपनीने दखल घेणे भाग पडले आणि त्यांनी या वादावर तोडगा काढण्यासाठी तयारी दर्शविली.

**दि. ११/१०/२०२५ रोजीची 'जाहीर नोटीस' दै. पुढारी मधून १३ ऑक्टोबर २०२५ रोजी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये व दै. लोकमत मधून १३ ऑक्टोबर २०२५ रोजी नाशिक जिल्हा आवृत्तीमधून प्रकाशित करण्यात आली आहे. तसेच वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे यांना व्यक्तीगतरित्या स्पीड पोस्ट द्वारे दि. ११/१०/२०२५ रोजी पाठविण्यात आली आहे.**

# जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री. ललित साकलचंद गांधी, अध्यक्ष महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रीकल्चर, ओरीकॉन हाऊस, सहावा मजला, काळा घोडा, फोर्ट, मुंबई यांनी दिले माहिती, दाखविले कागदपत्रे व दिले अधिकारानुसार तमाम लोकांना, सदर संस्थेचे सभासदांना तसेच संलग्न संस्थांना या जाहीर इशारा नोटीसीने सुचित करणेत येते की, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर ही संस्था महाराष्ट्र विश्वस्त कायदा १९५० अन्वये नोंदली असून त्याचा नोंदणी क्र. ई-६७४७ असा आहे. सदर संस्थेची नोंदणी सहाय्यक धम ादाय आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयात झाली असून सदर संस्थेची मा. धर्मादाय आयुक्त यांनी मंजूर केलेली घटना असून संस्थेचे सर्व कामकाज मंजूर घटनेतील तरतूदी प्रमाणे चालते.

सदर संस्थेच्या घटनेतील तरतूदीनुसार गव्हर्नींग कौन्सीलची मुदत ही दोन वर्षे इतकी असून सन २०२४ ते २०२६ या कालावधीकरीता रितसर निवडणूक प्रक्रिया होऊन निवडणेत आलेले गव्हर्निंग कौन्सीलची घोषणा दि. १४/६/२०२४ रोजी करणेत आलेली आहे. तसेच घटनेनुसार गव्हर्नींग कौन्सील मधील अध्यक्ष व वरिष्ठ उपाध्यक्ष यांची निवड ही एक वर्षाकरीता करणेची आहे. त्यानुसार दि. १४/०६/२०२४ इ. रोजी झालेल्या अध्यक्ष व वरिष्ठ उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीनुसार निवडीनुसार सन २०२४ ते २०२५ या कालावधीकरीता गव्हर्निंग कौन्सील अध्यक्ष म्हणून आमचे अशिल श्री. ललित साकलचंद गांधी व वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून श्री. रविंद्र माणगांवे यांची निवड झालेली होती.

तद्नंतर सन २०२५ ते २०२६ या कालावधीकरीता अध्यक्ष व वरिष्ठ उपाध्यक्ष निवडी संदर्भातील प्रक्रिया निवडणूक अधिकारी यांनी पूर्ण करुन त्यानुसार निवडणेत आलेल्या अध्यक्ष व वरिष्ठ उपाध्यक्ष यांचा निकाल दि. २३/०९/२०२५ इ. रोजीच्या ९८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये जाहिर करणेत आला असून, त्यानुसार आमचे अशिल श्री. ललित साकलचंद गांधी यांची २०२५ ते २०२६ या कालावधीकरीता अध्यक्ष पदी व श्री. रविंद्र माणगांवे यांची वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड करणेत आली असून आज रोजी आमचे अशिल अध्यक्ष नात्याने सदर संस्थेचे सर्व व्यवस्थापन पाहत आहेत.

आमचे अशिल ललित गांधी यांनी सदर संस्थेमध्ये त्यांच्या अनुभवाचे जोरावर व व्यवस्थापनाचे कौशल्याचे जोरावर अत्यंत उल्लेखनीय असे कामकाज केले असून सदरची संस्था संपूर्ण महाराष्ट्राम ध्ये नावारुपाला आणलेली आहे, त्यांच्या कार्याचे वेळोवेळी संस्थेच्या सर्व सभासदांनी कौतुक सुध्दा केलेले आहे व त्याचाच भाग म्हणजे दि. २३/०९/२०२५ इ. रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. ३ नुसार सन २०२४ ते २०२५ या कालावधीमध्ये अत्यंत उत्तम कार्य झाले असल्याचे नमूद करुन श्री. ललित सा. गांधी यांच्या कार्याचे समर्थन केले असून सदरचा ठराव हा ललित गांधी यांनी सन २०२४ ते २०२५ या कालावधीमध्ये उत्तम प्रकारे कामकाज केलेची पोहच आहे व त्यामुळेच संस्थेच्या सभासदांनी त्यांची सन २०२५ ते २०२६ या वर्षाकरीता बिनविरोध अध्यक्ष म्हणून निवड केलेली आहे व श्री. ललित सा. गांधी हे अध्यक्ष म्हणून संस्थेचे कामकाज अविरतपणे व प्रामाणिकपणे करीत आहेत.

सदर प्रमाणे वस्तुस्थिती असताना संस्थेची दि. २३/०९/२०२५ इ. रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा झालेनंतर काही विश्वस्तांकडून संस्थेसंदर्भात व आमचे अशिलांविरुध्द अपप्रचार करणेस सुरुवात केली असून त्यांनी श्री. ललित सा. गांधी यांनी सदर संस्थेचा अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला असल्याचे भासवून वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. रविंद्र माणगांवे यांची प्रभारी अध्यक्ष म्हणून निवड केली असल्याचे भासविण्याचा प्रयत्न करीत असून, त्या आशयाच्या बातम्या दैनिक वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करणेत आल्या असून त्या माध्यमातून संस्थेमधील सभासदांची संबंधीत संस्थांची व तमाम लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न चालू केलेला आहे. त्यामुळे वस्तुस्थिती सभासदांसमोर आणणेकरीता आमचे अशिलांस सदरची जाहिर ईशारा नोटीस प्रसिध्द करावी लागत आहे.

वास्तविक श्री. ललित सा. गांधी यांनी केव्हाही आपल्या अध्यक्ष पदाचा राजीनामा दिलेला नव्हता व नाही, त्यामुळे अध्यक्ष पद हे रिक्त झालेले नाही. त्यामुळे श्री. रविंद्र माणगांवे यांची प्रभारी अध्यक्ष म्हणून निवड होणेचा प्रश्नच उद्‌भवत नाही. अशी वस्तुस्थिती असताना श्री. रविंद्र माणगांवे हे बेकायदेशीररित्या प्रभारी अध्यक्ष असल्याचे भासवून आमचे अशिलांना संस्थेचे कामकाज करीत असताना अडथळा करण्याचा प्रयत्न करीत असलेने सदरच्या सर्व प्रकाराबाबत आमचे अशिल श्री. ललित गांधी यांनी त्यांच्या विरुध्द रितसर तक्रार अर्ज सुध्दा दाखल केलेला आहे.

सबब, सदर जाहिर इशारा नोटीसीने सुचित करणेत येते की, श्री. ललित सा. गांधी हे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री व ॲग्रीकल्चर या संस्थेचे घटनेतील तरतूदीनुसार निवडलेले अध्यक्ष असून अध्यक्ष नात्याने संस्थेचे कामकाज पाहत असून श्री. रविंद्र माणगांवे यांचा संस्थेच्या अध्यक्ष पदाशी काही एक संबंध नसलेने कोणीही त्यांचेशी प्रभारी अध्यक्ष म्हणून कोणताही व्यवहार अगर पत्रव्यवहार करु नये. याऊपरही कोणी त्यांचेशी कोणताही व्यवहार अगर पत्रव्यवहार केला अगर स्वीकारला तर होणाऱ्या परिणामाकरीता ते सर्वस्वी जबाबदार राहतील. त्यास संस्था अगर आमचे अशिल श्री. ललित साकलचंद गांधी हे जबाबदार राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**कोल्हापूर, दि.११ ऑक्टोबर २०२५**

**सही/- ॲड. प्रशांत एस. भावके**

१०३/३, विश्वकर्मा प्रेस्टीज, फेज-३, खानविलकर पंपा जवळ, नागाळ पार्क, कोल्हापूर

**Date of Publish : 29h October 2025** **Page No. 1 to 36**
WPP License No.: GR/KLP/114/2024-2026 License to post without prepayment. Posted on 29th October 2025 at RMS Kolhapur
Registered with Reg. of News Paper for India, Delhi under Regd. No. 20803/71, Postal Registration No. KLR-357/2024-2026




हे मासिक संपादक, मुद्रक, प्रकाशक ललित गांधी यांनी मालक महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर यांचेकरीता शिवम ऑफसेट,प्लॉट नं. डी-१११, फाइव स्टार एमआयडीसी, कागल-हातकणंगले, कोल्हापूर येथे छापुन बिझनेस हाऊस, १६७७, ई मेन रोड, राजारामपुरी १० वी गल्ली, कोल्हापूर - ४१६००८ येथे प्रसिध्द केले.

If undelivered please return to:
Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture
201, Sarda Sankul, Vakil Wadi, M.G. Road, Nashik-1